शनिवार, १० फेब्रुवारी २०२४

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०३ अंक - १७३

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६


आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 10 FEBRUARY 2024 adhunikkesari.com • YEAR-03 • ISSUE-173 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05


# बाळासाहेब ठाकरे यांना भारतरत्न द्या

## राज ठाकरे यांची केंद्र सरकारकडे मागणी



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्र सरकारकडे शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा, अशी मागणी केली आहे. राज ठाकरे यांनी ट्विट करत याबाबतची मागणी केली आहे. केंद्र सरकारने तीन दिग्गजांना शुक्रवारी भारतरत्न पुरस्कार घोषित केला आहे. यामध्ये माजी पंतप्रधान आणि काँग्रेस नेते नरसिंह राव, चौधरी चरण सिंग आणि प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि हरित क्रांतीचे जनक एमएस स्वामीनाथन यांचा समावेश आहे. यानंतर आता राज ठाकरे यांनी केंद्र सरकारकडे बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी केली आहे.**



माजी पंतप्रधान स्व. पी.व्ही. नरसिंहराव, स्व. चौधरी चरण सिंग आणि भारतीय हरित क्रांतीचे जनक एस. स्वामिनाथन यांना भारतरत्न सन्मान घोषित करण्यात आला. ह्या यादीतले एस.स्वामिनाथन याचे अवघ्या काही महिन्यांपूर्वी निधन झाले. इतकी अफाट कामगिरी करणाऱ्या शास्त्रज्ञाला त्यांच्या हयातीत हा बहुमान मिळायला हवा होता, अशी भावना राज ठाकरे यांनी व्यक्त केली.

दुसरीकडे शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या मुद्द्यावरुन केंद्र सरकारवर ट्विटच्या माध्यमातून निशाणा साधला आहे. हिंदुत्ववादी म्हणवून घेणाऱ्या मोदी सरकारला पुन्हा एकदा हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विस्मरण झाले. आधी 2 आणि आता एकदम 3 असे एका महिन्यात 5 नेत्यांना भारतरत्नने सन्मानित करण्यात आले. पण त्यात ना वीर सावरकर ना शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, असे संजय राऊत म्हणाले. खरे तर नियम असा आहे की एका वर्षात जास्तीत जास्त 3 भारतरत्न देता येतात. मोदी यांनी एका महिन्यात 5 जणांना भारतरत्न जाहीर केले. निवडणुकांची धामधूम. दुसरे काय?, अशी टीका राऊतांनी केली. कर्पुरी ठाकूर आणि लालकृष्ण अडवानी यांच्या मागोमाग आता चौधरी चरण सिंग, पी. वी. नरसिंहराव आणि एम एस स्वामिनाथन यांना भाररत्नने सन्मानित केले. आणखी काही नेते प्रतीक्षेत आहेत. पण बाळासाहेब ठाकरे यांचे विस्मरण का? ज्यांनी सारा भारत हिंदुमय केला, ज्यांच्यामुळे मोदी अयोध्येत राममंदिर सोहोळा करू शकले, असे संजय राऊत म्हणाले आहेत.

### महत्त्वाची बातमी

## सोन्याच्या दरात पुन्हा घसरण

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारीला लोकसभा निवडणुकीपूर्वीचा शेवटचा अर्थसंकल्प सादर केल्यावर दुसऱ्या दिवशी २ फेब्रुवारीला नागपुरात सोन्याचे दर वाढून ६३ हजार ५०० रुपये प्रति दहा ग्रामवर पोहोचले होते. परंतु सोन्याच्या दरात घसरन झाल्याने शुक्रवारी (९ फेब्रुवारी) हे दर २९ हजार ९०० रुपये प्रति दहा ग्रामपर्यंत खाली आले आहे. नागपुरातील सोन्याच्या दरांमध्ये चढ- उतार थांबण्याचे नाव घेत नाही. नागपुरात ९ फेब्रुवारीला २४ कॅरेट सोन्याचे दर ६२ हजार ९०० रुपये प्रति दहा ग्राम होते. हे दर २२ कॅरेटसाठी ५९ हजार ८०० रुपये, १८ कॅरेटचा दर ५० हजार ३०० रुपये, १४ कॅरेटचा दर ४० हजार ९०० रुपये नोंदवले गेले. तर चांदीचा दर प्रति किलो ७१ हजार ४०० रुपये होता. दरम्यान हे दर २ फेब्रुवारीच्या दुपारी २४ कॅरेट सोन्याचे दर ६३ हजार ५०० रुपये प्रति दहा ग्राम होते. हे दर २२ कॅरेटसाठी ६० हजार ३०० रुपये, १८ कॅरेटचा दर ५० हजार ८०० रुपये, १४ कॅरेटचा दर ४१ हजार ३०० रुपये नोंदवले गेले. तर चांदीचा दर प्रति किलो ७२ हजार ५०० रुपये होता. दरम्यान सोन्याच्या दरात सतत बदल होत असले तरी काही महिन्यात हे दर ६५ हजार रुपये प्रति दहा ग्रामपर्यंत जाण्याची शक्यता नागपुरातील सराफा व्यापाऱ्यांकडून वर्तवली जात आहे. नागपुरात २९ जानेवारीला सकाळी २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम सोन्याचे दर ६२ हजार ८०० रुपये, २२ कॅरेटचा दर ५९ हजार ७०० रुपये, १८ कॅरेटचा दर ५० हजार २०० रुपये, १४ कॅरेटचा दर ४० हजार ८०० रुपये होता. तर चांदीचा दर प्रति किलो ७२ हजार २०० रुपये होता.

## बांधकाम मंत्री चव्हाणांच्या कार्यक्रमावर पालकमंत्री, खासदारांचा बहिष्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** महायुतीतील घटक पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या घरी मंत्री रविंद्र चव्हाण चहापाण्यासाठी गेल्याने नाराज झालेल्या पालकमंत्री व खासदारांनी कार्यक्रमावरच बहिष्कार टाकण्याची घटना गुरूवारी रात्री घडली. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी बांधकाम विभागाच्या कार्यालय इमारतीचे भूमीपूजन केले. शासकीय विश्रामगृह आवार मिरज येथे सांगली जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग मिरज कार्यालयीन इमारतीचे भूमिपूजन व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध विकास कामांचे आभासी पध्दतीने भूमिपूजन व लोकार्पण सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्याहस्ते गुरूवारी रात्री नउ वाजता करण्यात आले. निमंत्रण पत्रिकेवर अध्यक्ष स्थान पालकमंत्री सुरेश खाडे यांच्याकडे तर प्रमुख उपस्थितांमध्ये खासदार संजयकाका पाटील, आमदार सुधीर गाडगीळ यांच्यासह मान्यवरांची नावे होती.मात्र पालकमंत्री खाडे व खासदार पाटील यांनी कार्यक्रमाकडे पाठ फिरवली. तथापि, आमदार सुधीर गाडगीळ, भाजपचे संघटन मंत्री मकरंद देशपांडे, जनुसुराज्यचे प्रदेशाध्यक्ष समित कदम उपस्थित होते. तथापि, हरिपूरजवळ कृष्णा नदीवर नव्याने उभारलेल्या कोथळी पूलाचे उद्घाटन झाल्यानंतर मंत्री चव्हाण यांनी मिरजेत थेट यावे आणि बांधकाम विभागाच्या कार्यालयाचे उद्घाटन करावे असा आग्रह पालकमंत्री खाडे आणि खासदार पाटील यांनी धरला होता. मात्र, मंत्री चव्हाण यांनी जनसुराज्यचे प्रदेशाध्यक्ष समित कदम हे आपले मित्र आहेत, त्यांच्या निवासस्थानी चहापाणी करण्यास जाणारच अशी भूमिका घेत भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष माजी आमदार पृथ्वीराज देशमुख यांच्यासोबत कदम यांच्या निवासस्थानी गेले. या प्रकारामुळे नाराज झालेल्या पालकमंत्री खाडे आणि खासदार पाटील यांनी मिरजेतील शासकीय कार्यक्रमाकडे पाठ फिरवली. या कार्यक्रमाचे आमंत्रण खुद्द पालकमंत्र्यांच्या जनसंपर्क कार्यालयातून कार्यकर्त्यांना देण्यात आले होते. या निमंत्रणानुसार अनेक कार्यकर्ते मिरजेतील कार्यक्रमासाठी हजर होते. मात्र, महायुतीत सहभागी असलेल्या जनुसराज्यचे प्रदेशाध्यक्ष श्री कदम यांच्या घरी मंत्री चव्हाण चहापाण्यासाठी गेल्याने आपल्या समर्थक कार्यकर्त्यांना कार्यक्रम स्थळापासून परत या असे निरोप देण्यात आले. यामुळे आज दिवसभर जिल्ह्यात राजकीय नाराजी नाट्याची चर्चा सुरू होती.


## महाराष्ट्राची स्थिती यूपी, बिहारसारखी

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** शिवसेनेचे माजी नगरसेवक आणि नेते अभिषेक घोसाळकर यांच्यावरील हल्ला हा सुनियोजित आहे. गोळ्या घालून खून केल्यानंतर आरोपीने आत्महत्या केली. यामागे कोण आहे, हे समोर यायला हवे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रची स्थिती यूपी, बिहार करून ठेवली आहे, अशी टीका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली. ते शुक्रवारी नागपूर येथे बोलत होते. एका लोकप्रतिनिधीवर गोळीबार होतो यापेक्षा राज्याचे दुसरे काय दुर्दैव असू शकते ? शिवसेनेचे माजी नगरसेवक आणि नेते अभिषेक घोसाळकर यांच्यावर गोळीबार झाल्याची घटना धक्कादायक असून राज्यातील एक नागरिक म्हणून प्रचंड चीड आणणारी आहे. या हत्येमागे सत्ताधारी पक्षाचा प्रवक्ता असल्याचा अरोपही वडेट्टीवार यांनी केला. एका मागून एक गोळीबाराच्या घटना राज्यात घडत आहेत मुख्यमंत्री आणि गृहमंत्री ठिकाणावर आहेत का? नुसती कारवाई करतो, चौकशी करतो हे तुमचे शब्द किती पोकळ आहेत, बघताय का? लोकप्रतिनिधी सुरक्षित नाही, नेत्यांवर गोळीबार होतोय, सत्ताधारी आमदार बंदुका घेऊन दहशत माजवत आहे. अश्या बातम्या पूर्वी फक्त बिहार आणि उत्तरप्रदेश मधून यायच्या. आज हे चित्र महाराष्ट्रातील जनता प्रत्यक्ष आपल्या राज्यात बघत आहे. राज्यात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री गुंडांना राजाश्रय देत आहेत, एकमेकांवर कुरघोडी करण्यात व्यस्त आहे. बाहेर काय सुरू आहे याची जाणीव तरी आहे का? गुंडांना राजाश्रय मिळत असेल तर कायद्याचा धाक त्यांच्यावर का राहणार ? असे वडेट्टीवार म्हणाले.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

वेळ संध्याकाळची. थोडा अंधार पडायला लागला होता. घरातले दिवे लावले. पण देवाजवळही दिवा लावल्याशिवाय बरं वाटत नाही. किंबहुना आपली परंपराच आहे ती ! थोडा वेळ दिवा लावून देवाजवळच शांत बसून राहावं. त्याच्यासारखं सुख नाही. देवाजवळच्या समईच्या वातींना थोडा गुल ( कार्बन ) आला होता. तो बाजूला केला. समईत थोडं तेल घातलं आणि काडी पेटवली. वातींनी पेट घेतला. समईच्या ज्योतीकडे पाहिलं. सुरुवातीला ज्योत काही क्षण निळसर भासली. नंतर ती पिवळ्या सोनेरी रंगाची झाली. काही वेळानं समईतलं तेल संपल्यानंतर ती जेव्हा मालवली तेव्हा किंचित काळ लालसर होऊन शांत झाली. या ज्योतीकडे पाहत असताना मानवी जीवनासंबंधी मनात विविध विचार आले. सुरुवातीला ती ज्योत निळसर दिसली. हा निळा रंग म्हणजे आपले बाल्य. ती ज्योत जशी क्षण दोन क्षण निळी दिसते तसेच आपले बाल्यही रम्य असते. अल्पकाळ टिकणारे असते. कधी संपते ते कळत नाही. म्हणून तर बालपणीचा काळ सुखाचा असे आपण म्हणतो. निळ्या रंगाचे हे पक्षी केव्हा भुर्रकन उडून जातात ते कळत नाही. पण आठवणी मात्र जन्मभरासाठी ठेवून जातात. पण ही सुरुवातीची ज्योत वादळवाऱ्यापासून खूप जपावी लागते. तिला थोडाही वाराही सहन होत नाही. म्हणून सुरुवातीला तिचे रक्षण करावे लागते. कधी ज्योतीभोवती आपण काच लावतो, तर कधी हातांचा आडोसा करतो. घरात पंखा सुरु असेल तर पंखा बंद करावा लागतो. बाल्य जपायचे असेल तर ते सांभाळणाऱ्या हातांना सुखाचा त्याग करावाच लागतो. तरच ही ज्योत तेवत राहते. एकदा का ज्योत पुरेशी प्रकाशमान झाली की थोड्याशा वाऱ्यापासून तिला फारशी भीती नसते. आणि आता तिला वाऱ्याला भिऊन चालणारही नसते. तिला प्रकाशायचे असते. बालपणीची निळसर झाक कुठल्या कुठे विरून जाते आणि तारुण्याचा सोनेरी प्रकाश उजळतो. ही ज्योत प्रकाशमान होण्यासाठी दिव्यातल्या दोन वाती एकत्र येतात. त्या जळत जातात, कणाकणाने झिजत जातात. या दोन वाती म्हणजे आपले आईवडील.






# आनंदी पहाट

## मन आणि तन सक्षम करावे

आधुनिक केसरी

आपल्यापैकी प्रत्येकजण दिवसाची रात्र, रात्रीचा दिवस करून दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यासाठी धडपडत असतो. सद्यःस्थितीत आपल्या मुलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी सर्वप्रथम अर्थार्जन अनिवार्य झाले आहे. तसे बघितले तर अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीनही मुलभूत गरजांची पूर्तता शरीरासाठीच होत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

पण मनाचे काय? ते दिसत नसले तरीही असतेच. आपल्या जगण्यापलीकडच्या जीवनाला मनामुळे आपले आयुष्य वेगळे असल्याची प्रचीती येत असते. अनेकांकडून केवळ शरीरासाठीच सर्वकाही केले जात असते. परंतू आपल्या मनाचा, मनातल्या मनात, मनमुरादपणे किंवा मनमारून, मनपसंद असा कधी विचार खरेच होतो का? निदान तसे अनेकांच्या बाबतीत दिसत तरी नाही. मनंच आपल्याला जगायला शिकवत असते, मनंच आपल्याला पदोपदी अनेकविध निरनिराळ्या प्रसंगांची अनुभूती देत असते. दुसऱ्याच्याच काय पण आपल्या स्वतःच्या मनाचा सुद्धा थांग पत्ता लागणे मुश्कील असते. आपल्या शरीरावर ताबा ठेवून त्याला आपण स्थिर करू शकतो, पण मनावर नियंत्रण ठेवणे मोठे कठीण काम असते. मनाचा विचार न करता केवळ कोणत्यातरी अनावश्यक बाबींचा अनावधानाने विचार करणे ह्यामध्ये सुरु होत असते. काही प्रमाणांत अशी व्यक्ती आत्मकेंद्रित झाल्याचा आपल्याला प्रत्यय येऊ लागतो. अशा व्यक्तींच्या अंतर्मनांत सुरु असलेल्या वैचारिक प्रक्रियेत अनाठायी विचारांचा कल्लोळ माजलेला असतो. त्यांच्या शरीर आणि मन ह्याचा मिलाफ होणे शक्य होत नाही. मनातील विचार आणि शरीराचे वर्तन ह्यांचा परस्परांशी संबंध राहिलेला नसतो.



आधुनिक केसरी

## पाळावा स्वधर्म | संसारात ||

ठेऊनी विश्वास | करावा संसार ||
आय-व्येय सार | जाणोनिया ||१||
यादी गरजांची | वाढे निरंतर ||
म्हणोनि संसार | दुःख मुळ ||२||
सुख दुःख दोन्ही | करी येरझार ||
गुंतूनीया फार | पडु नये ||३||
आपण आपला | उचलावा भार ||
करूनी शेजार | सात्विकांचा ||४||
सत्कर्माचे ठायी | आनंद सागर ||
फाटका संसार | म्हणू नये ||५||
अध्यात्माचे मुळ | पाळावा स्वधर्म ||
जाणावे हे वर्म | संसारात ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण


आधुनिक केसरी

आदिदैविक तो कैसा । कवण तयाची दशा ।
हेंहि विशद कळे ऐसा । वि्तार कीजे ॥ ११ ॥
हां जी म्हणोनि वक्ता । जाला कथा विस्तारिता ।
आध्यात्मिक ताप आतां । सावध ऐका ॥ १२ ॥
देह इंद्रिय आणी प्राण । यांचेनि योगें आपण ।
सुखदुःखें सिणे जाण । या नांव आध्यात्मिक ॥ १३ ॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अहंकार मन साथ है,
इन्द्रिन कर्म मिलाय ।
रुप मनोमय कोश है, जा महँ सृष्टि
समाय ।।४८।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल
सप्तम अध्याय) ०२/०७/४८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
पाच कर्मेंद्रिये, अहंकार आणि मनासह मनोमय कोशाचे स्वरूप बनते. या कोशात मन प्रधान आहे म्हणून यास मनोमय कोश म्हणतात. मनातच सर्व सृष्टी सामावलेली आहे. समस्त जगत प्रपंचाची रचना हे मनाचेच साम्राज्य आहे.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# जाणपणनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

समोर जे जे दृष्य दिसते ते ते सर्व मिथ्या आहे. त्यामुळे समाधान होत नाही. मग होते काय? तर ज्ञाता स्वतःचेच ज्ञान वाढवण्याचा प्रयत्न करतो. त्यात त्याचा *मी पणा *किंवा मोठेपणा गळून पडतो. आता अवलोकन केले तर लक्षात येईल की शिल्लक काय राहिले आहे?++++तर अखेरीस केवळ ज्ञानमय शुध्द आत्मस्वरूप शिल्लक उरते. हेच आत्मज्ञान *होय. माया व ब्रम्ह कसे ते जाणावे आपण "मी कोण"? हे समजून घ्यावे. मी पणाचा गर्व कधीच करू नये. असे ज्ञानवंत झाले तर जन्ममरणाच्या फे-यातून सुटका होते. समर्थ ज्ञान आणि अज्ञान यांची तुलना समजावतात. प्रथम भगवंताच्या रूपाचे ज्ञान करून घ्यावे. त्यानंतर व्यवहारातील प्रसंग ओळखून वागावे.असे केल्यास फार मोठे भाग्य वाट्याला येते. वैभव प्राप्त होते. कोणतेही ज्ञान सामान्य समजू नये. म्हणजेच मिथ्या गर्व करू नये. मी एकटाच न काय तो ज्ञानी बाकी सगळे अडाणी या भ्रमात राहू नये. अज्ञानी माणसाने अंधारात एक दृष्य बघितले,त्याला वाटले हे भूत आहे,अज्ञान असल्यामूळे खोट्या कल्पनेने झपाटलेला गेला लोक त्याला वेडा समजू लागले अति शोक घातक असतो हे त्याला समजत नाही.तो आपल्या प्राणास मुकला. म्हणून खरे ज्ञान समजून घ्यावे. जाणता सर्व बाजूने विचार करून वागतो.

# संत एकनाथ


आधुनिक केसरी

चक्रपाणी आणि सरस्वती हे त्यांचे आजोबा व आजी होत एकनाथांचे गुरू सद्गुरू जनार्दनस्वामी हे देवगड (देवगिरी) येथे या दरबारी अधिपती होते. हे मुळचे चाळीसगावचे रहिवासी; त्यांचे आडनाव देशपांडे होते. ते दत्तोपासक होते. गुरू म्हणून संत एकनाथांनी त्यांना मनोमन वरले होते. नाथांनी परिश्रम करून गुरूसेवा केली आणि साक्षात दत्तात्रेयांनी त्यांना दर्शन दिले; द्वारपाल म्हणून दत्तात्रेय नाथांच्या द्वारी उभे असत असे म्हणतात. नाथांनी अनेक तीर्थयात्राही केल्या. नाथांनी पैठणजवळच्या वैजापूर येथील एका मुलीशी विवाह केला.

# प्रपंचातले सुख-दुःख हे केवळ जाणिवेत आहे

आधुनिक केसरी

प्रापंचिकाच्या मनात नेहमी एक शंका येते की, खोटे करूनसुद्धा जर सुखी होता येते तर तसे करायला काय हरकत आहे ? सन्मार्गाने गेला तरी माणूस दुःखी का होतो, अशीही शंका आपल्याला येते. मी देवाला भिऊन वागलो, का, तर प्रपंच सुखाचा व्हावा म्हणून. देवाची एवढी खटपट करूनही जर सुखी होता येत नाही तर काय उपयोग ? किती विचित्र आहे पाहा, खेळातले घर बांधायला आपण गवंडी बोलावण्यासारखा हा प्रकार आहे ! प्रपंचात दक्षता ठेवणे जरूर आहे; ते जर आपण केले नाही तर देवाने काय करावे ? भगवंताचा 'साधन' म्हणून आपण उपयोग करतो, आणि शेवटी साधनालाच दोष देतो, साध्य बाजूलाच राहते. भगवंत विषय देईल, पण त्याबरोबर त्याचे दुःखही देईल. एकजण मारुतिरायाला सांगून चोरी करीत असतो. तो एकदा पकडला गेला आणि त्याला शिक्षाही झाली; तेव्हा तीही मारुतीच्या संमतीनेच झाली असे नाही का? 'मी कोण' हे जोवर आपण ओळखत नाही तोवर, वैभवाच्या शिखरावर जरी गेलो तरी आपल्याला



समाधान मिळणार नाही. ज्याच्यापासून प्रपंच झाला, त्याला ओळखता आले पाहिजे. देहच सत्य नाही तर त्यावर उभारलेली इमारत कुठून सत्य असणार ? ठिगळे लावून आपण आपला प्रपंच करतो; मग त्यात कमतरता आल्याशिवाय नाही राहात ! कोळसा उगाळून पांढरा रंग मिळेल हे म्हणणे जसे वेडेपणाचे आहे, तसे प्रपंचात सुख मिळवीन हे म्हणणे आहे. सुखदुःख हे जाणिवेत आहे. आपल्याला मिळायचे तेवढेच मिळते, पण आपले हवे-नकोपण, म्हणजे आपली वासना, गेली की सुखदुःख राहात नाही. वासना मारायला, भगवंताचे अधिष्ठान हाच एक उपाय आहे. वासना ही लाडावलेल्या कुत्र्याप्रमाणे आहे, तिला नुसते हड्हड् करून ती बाजूला जात नाही. पण तेही बरोबरच आहे, कारण आपणच तिला लाडावून ठेवले आहे, म्हणून भगवंताच्या पूजेच्या वेळीसुद्धा ती देवघरात येते. शिवाय, वाईट वासनेमध्ये चांगल्या वासनेला मारण्याचे बळ आहे, कारण आपण स्वतः वाईट वासनेच्या बाजूचेच आहोत ! वासना ही कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ 'वास' ठेवला तरच ती नष्ट होते. 'मी कर्ता नसून परमात्मा कर्ता आहे' अशी भावना झाल्याशिवाय मन भगवंताला अर्पण होणार नाही; ते अर्पण झाल्याशिवाय फळाची अपेक्षा सुटणार नाही; आणि फळाची अपेक्षा सुटल्याशिवाय जीवाला शांती मिळणार नाही.

**८७. वासना म्हणजे देवाच्या विरूद्ध असलेली आपली इच्छा.**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, १० फेब्रुवारी २०२४
पान ६




# ब्लॅकमेलिंगला कंटाळून केली आत्महत्या

## महिला, मुलांचे मृतदेह शेततळ्यात आढळल्याने खळबळ

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** शिवापूर (शेळकेवाडी) ता.निफाड येथील विवाहित महिला दोन मुलांसह दि.५ फेब्रुवारी पासून बेपत्ता होती. याबाबत लासलगाव पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल होती मात्र, काल सायंकाळी तिघांचेही मृतदेह शेततळ्यात आढळून आल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे. दरम्यान एक २४ वर्षीय युवक ब्लॅकमेल करत असल्याने तिघांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याने त्याच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, सौ.ज्योती जालिंदर कोटकर या मुलगा हरीश (वय ५) व कृष्णा (वय ७) यांच्यासह दिनांक ५ फेब्रुवारी २०२४ सकाळी ८ वा.पासून घरी कुणालाही न सांगता घरातून निघून गेले आहेत. मात्र काल सायंकाळी महिला आणि तिच्या दोन्ही मुलांचा मृतदेह शेततळ्यात आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती कळताच निफाड उपविभागीय अधिकारी डॉ.निलेश पालवे, लासलगावचे स.पो.नि.भास्करराव शिंदे, पो.उपनिरीक्षक प्रवीण उदे फौजफाट्यासह तातडीने घटनास्थळी दाखल होत मृतदेह शवविच्छेदनासाठी निफाडच्या सरकारी रुग्णालयात पाठविण्यात आले. मयत ज्योतीचे





बंधू ललित कैलास कापसे रा.निफाड यांचे माहितीवरून लासलगाव पोलीस ठाण्यात सी.आर.पी.सी कलम १७४ अन्वये आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान मयत महिलेचा चुलत दिर तेजस रामेश्वर कोटकर (वय २४) हा मयत ज्योती हिस तिचे इन्स्टाग्राम अकांउटवर मेसेज तसेच वारंवार फोन करुन त्याच्याशी जबरदस्तीने बोलण्यास भाग पाडुन तिचा मानसिक छळ करुन तु माझ्याशी बोल, तु माझ्याशी बोलली नाही तर मी तुझ्या नवऱ्याला सर्व गोष्टी सागुंन तुझ वाटोळे करेल अशी धमकी देत असल्याच्या या कारणावरुन फिर्यादीची बहिण ज्योती ही आपल्या मुलांना घेऊन घरातून बाहेर निघून गेली व त्यांचे शेतगट २२८ मध्ये आपल्या दोन मुलांसह आत्महत्या केली आहे अशी तक्रार मयत ज्योती हिचा भाऊ ललित कापसे यांनी केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून ज्योती हिचा मानसिक छळ करुन तीला तिचे मुलांसह आत्महत्येस प्रवृत्त केले म्हणुन तेजस कोटकर यांच्याविरोधात लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स.पो.नि बी.जे.शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एस.आय. प्रवीण उदे तपास करीत आहेत.

# हाफिज सईदच्या मुलाला जनतेने पराभूत केले

आधुनिक केसरी न्यूज

**लाहोर :** पाकिस्तानमध्ये नुकत्याच सार्वत्रिक निवडणुका संपन्न झाल्या. ज्याचे निकाल आज (दि. ९ फेब्रुवारी) लागत आहेत. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान हे तुरुंगात असून त्यांच्या पक्षाचे नेते अपक्ष निवडणूक लढवत आहेत. हाती येत असलेल्या माहितीनुसार नवाझ शरीफ यांच्या पक्षाला ते टक्कर देत आहेत. दरम्यान मुंबईवर २६/११ च्या हल्ल्याचा मास्टरमाईंड हाफिज सईद याचा मुलगा तल्हा सईद हा लाहोर एनए-१२२ या मतदारसंघातून निवडणुकीला उभा होता. मात्र पाकिस्तानच्या जनतेने दहशतवाद्याच्या मुलाला स्वीकारले नाही. या निवडणुकीत हाफिज सईदच्या मुलाचा अतिशय दारूण पराभव झाला. यामुळे आपल्या मुलाला संसदेत पाठविण्याचा हाफिज सईदचा डाव धुळीस मिळाला, असल्याचे सांगितले जाते.
लाहोर एनए-१२२ या मतदारसंघातील इम्रान खान यांच्या पक्षाचा अपक्ष उमेदवार लतीफ खोसा याने विजय मिळविला. त्याला १ लाख १७ हजार १०९ एवढे प्रचंड मतदान मिळाले. तर नवाझ शरीफ यांच्या पक्षाचे उमेदवार ख्वाजा साद रफिक यांना ७७,९०७ मते मिळाली. हाफिज सईदच्या मुलाला केवळ २०४२ मते मिळाली. हाफिज सईद याने पाकिस्तानच्या राजकारणावर पकड मिळविण्यासाठी पाकिस्तान मरकजी मुस्लीम लीगची (PMML) स्थापना केली होती. हाफिज सईदच्या पक्षाने संसद आणि राज्यातील विधानसभांच्या सर्व जागांवर उमेदवार उभे केले होते. मात्र एकाही जागेवर त्याच्या पक्षाच्या उमेदवारांना विजय मिळविता आलेला नाही. हाफिजचा मुलगा तल्हा सईद याचा तर पराभव झालाच.



# जिंतूर तालुका कोचिंग क्लासेस असोसिएशन अध्यक्षपदी संजय माहुरकर

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुका कोचिंग क्लासेस असोसिएशनची कार्यकारिणी जाहीर झाली असून त्यात ज्ञानांकुर कोचिंग क्लासेस चे संचालक श्री.संजय माहुरकर सर यांची अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. तर कार्याध्यक्ष म्हणून जेष्ठ शिक्षक यशवंत कोचिंग क्लासेस चे संचालक श्री.बी.टी.सांगळे सर, उपाध्यक्ष म्हणून प्राईम कोचिंग क्लासेस चे संचालक श्री.राहुल प्रधान सर, सचिव म्हणून सायन्स अकॅडमी चे श्री.सतिश इप्पर सर, कोषाध्यक्ष म्हणून सरस्वती कोचिंग क्लासेसच्या सौ.सुभाशिनी जाधव मॅडम, सहसचिव म्हणून न्यूटन ग्लोबल अकॅडमीचे संचालक श्री.प्रशांत तायडे सर, प्रसिद्धी प्रमुख म्हणून R.B. कोचिंग क्लासेसचे संचालक श्री.अरुण राऊत सर या सर्वांची एकमताने निवड करण्यात आली. तर याप्रसंगी श्री.अजय सोनुने सर,श्री.दिलीप लिखे सर,श्री.भुजबळ सर,श्री.सुनिल चव्हाण सर, श्री.शाम चव्हाण सर,श्री.वैजनाथ लांडे सर, श्री.गजानन सांगळे सर सौ.पी.टी.बोराळकर मॅडम, सौ.रेखा शेळके मॅडम, सौ.सोनाली सांगळे मॅडम, सौ.अनुजा राठोड मॅडम, सौ.सपना त्रिभुवन मॅडम, सौ.सुषमा कामठे मॅडम, सौ.वावरे मॅडम, सौ.अर्चना राऊत मॅडम आदी सदस्य उपस्थित होते.

# ग्राम परिक्रमा यात्रेच्या माध्यमातून भाजपा कार्यकर्ते २ लाख खेड्यांपर्यंत पोहोचणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मोदी सरकारच्या कार्यकाळातील शेतकरी हिताच्या विकास कामांची माहिती देशातील २ लाख खेड्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा तर्फे १२ फेब्रुवारीपासून 'ग्राम परिक्रमा यात्रा' काढण्यात येणार असल्याची माहिती किसान मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.जगतप्रकाश चाहर यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी किसान मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व प्रदेश प्रभारी बन्सीलाल गुर्जर, किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे आदी उपस्थित होते. मोदी सरकारच्या शेतकरी हिताच्या योजनांवर चर्चा तसेच पंतप्रधान मोदी यांच्या संकल्पपत्रासाठी शेतक-यांकडून सूचना व अपेक्षा जाणून घेण्याचा प्रयत्न या ग्राम परिक्रमा यात्रेतून केला जाणार असल्याचे श्री. चाहर यांनी यावेळी सांगितले. चाहर यांनी सांगितले की, १२ फेब्रुवारी रोजी उत्तर प्रदेशमधील मुजफ्फरनगर येथील सुखदेव आश्रमाजवळ होणा-या भाजपा चे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या विशाल सभेने या यात्रेचा प्रारंभ होणार आहे. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, पक्षाचे पदाधिकारी आदी उपस्थित रहाणार आहेत. गावागावांतून गाय, नांगर, ट्रॅक्टर व अन्य कृषी यंत्रांची पूजा करून यात्रेला सुरुवात होणार आहे. पुढे महिनाभर चालणा-या या यात्रेदरम्यान शेतक-यांच्या कल्याणासाठी मोदी सरकारने राबवलेल्या योजनांची माहिती शेतकरी, शेतमजुरांपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे. मोदी सरकारने शेतक-यांसाठी राबवलेल्या कल्याणकारी योजनांमुळे देशातील शेतकरी आत्मनिर्भर व समृद्ध होत आहे. मोदी सरकारच्या काळात कृषी क्षेत्राचा झालेला विकास, काँग्रेस सरकार आणि भाजपा सरकार यांच्या कामगिरीची तुलनात्मक आकडेवारी या यात्रेदरम्यान शेतकऱ्यांपुढे ठेवण्यात येणार आहे. शेतकऱ्यांबरोबर बैठकांचे आयोजन त्याबरोबरच घरोघरी जाऊन मोदी सरकारच्या विविध योजना व विकासकामांची माहिती देणा-या पत्रकाचे वितरण केले जाईल. प्रगतीशील शेतक-यांचा, सैनिकांचा तसेच देशासाठी हुतात्मा झालेल्या सैनिकांच्या कुटुंबियांचा यात्रे दरम्यान सन्मान केला जाणार आहे. प्रत्येक दिवशी प्रत्येक जिल्ह्यातील पाच गावांमध्ये ग्राम परिक्रमा यात्रा आयोजित करण्यात येणार असून खासदार, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोक प्रतिनिधी, भाजपा जिल्हा पदाधिकारी, मंडल पदाधिकारी या यात्रेत सहभागी होणार आहेत.

# भागवत कथा म्हणजे दु:ख नष्ट करणारे अमृत : पंढरीनाथ महाराज पगार

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापुर :** संत साहित्य मानवासाठी प्रेरक असून विविध धर्मग्रंथांनी मानवाला आत्मकल्याणाचा मार्ग दाखविला आहे. या मार्गावर चालून सर्वांनी आपले जीवन सत्कर्मी लावावे. भागवत कथा म्हणजे दु:ख समूळ नष्ट करणारे अमृत आहे, असे प्रतिपादन पंढरीनाथ महाराज पगार यांनी वैजापुर तालुक्यातील तलवाडा येथील बाबासाहेब मगर यांच्या संकल्पनेतून व सर्वानंदगिजी महाराज दाणे महाराज याच्या मार्गदर्शनाखाली सुरु आसलेल्या भागवत कथेप्रसंगी केले. पुढे बोलतांना पगार यांनी भागवत कथेचे महत्त्व आणि मानवी जीवनात त्याचे असलेले महत्त्व विषद केले. ते म्हणाले की भगवंतांचे स्वरूप दर्शविण्याचे आणि भगवत तत्त्वाचा निर्देश करण्याचे काम भागवत करते. जी व्यक्ती भगवंताची होते तिलाही भागवत म्हणतात. श्रीमदभागवत हे संसारातील भय दु:खाचा समूळ नाश करणारे अमृत आहे. मन शुद्ध करणारे याच्यापेक्षा चांगले साधन नाही. भगवंत प्राप्तीसाठी परमात्मा संबंधातील श्रवण, मनन, चिंतन हेच प्रत्येक जीवासाठी श्रीमद भागवत कथा हा ग्रंथ म्हणजे प्रत्येकाच्या अंतःकरणा मध्ये एक निर्मळ असा भाव निर्माण करणारा ग्रंथ आहे. आपला भाव शुद्ध ठेवून जर कथा श्रवण केली किंवा या ग्रंथाकडे जर भाव शुद्ध ठेवून बघितलं तर हा ग्रंथ कृपा करीत असतो, भागवत ग्रंथात केवळ कथा नाहीत, तर भगवंताच्या प्रत्येक कथांमधून प्रत्येक जीवाचा उद्धार कसा करावा, हेच सांगितले आहे. या ग्रंथातून अत्यंत सरळ आणि सोप्या भाषेत मानवजातीला अचूक मार्ग दाखविला आहे. भागवताकडे केवळ कथा म्हणून न पाहता, या कथांचे आपल्या जीवनात काय महत्त्व आहे आणि आपण त्यातील काय आत्मसात करायचे हे आपल्याला समजायला हवे. भागवत ग्रंथ म्हणजे ज्ञानयज्ञ सोहळा आहे. त्यामुळे



त्यातील तत्त्वज्ञान समजून घ्यायला हवे, असल्याचे प्रतिपादन पंढरीनाथ महाराज पगार त्यांनी यावेळी केले. दाणे महाराज पिंगलाताई चंदभानदादा महाराज पांडुरंग महाराज सुमधुर भक्तगीतांनी चैतन्य या भागवत कथेप्रसंगी भजन गायक कलाकारांनी सुमधुर भक्तगीते गाऊन भाविकांना मंत्रमुग्ध केले. नवीन कुमार यांनी बासरीवर तर सागर महाराज यांनी तबल्यावर साथसंगत केली. कृष्णा महाराज माऊली महाराज दादाभाऊ महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी भागिनाथ मगर राजेंद्र मगर दादाभाऊ मगर रवि कदम अर्जुन मगर भागवत मगर शिवा मगर परिश्रम घेतले.

## पटोलेंचा संताप

आधुनिक केसरी

ठाकरे गटाचे माजी नगरसवेक अभिषेक घोसाळकर यांची काल (८ फेब्रुवारी) निर्घुण हत्या झाली. मॉरिस नावाच्या व्यक्तीने त्यांच्यावर गोळ्या झाडून स्वतःही आत्महत्या केली. काही दिवसांपूर्वी उल्हासनगरमधील एका पोलीस ठाण्यात भाजपा आमदारानेही एकावर गोळीबार केला होता. राज्यात दिवसेंदिवस कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उभा राहिलेला असून लोकप्रतिनिधीच सुरक्षित नसल्याची टीका विरोधकांकडून केली जातेय. या पार्श्वभूमीवर गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी राजीनामा द्यावा, या मागणीला जोर धरू लागला आहे. या मागणीवरून फडणवीसांनी आज मोठं वक्तव्य केलं. या वक्तव्याचे पडसाद राजकीय पटलावरून उमटत आहेत. विरोधकांनी राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. याबाबत बोलताना फडणवीस म्हणाले की, विरोधकांनी राजीनाम्याची केलेली मागणी राजकीय आहे. विरोधी पक्षाची स्थिती अशी आहे की, गाडीखाली एखादा श्वान आला तरी ते गृहमंत्र्यांचा राजीनामा मागतील. देवेंद्र फडणवीसांच्या या वक्तव्यावरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले, गाडीखाली कुत्रा आला तरीही विरोधक गृहमंत्र्यांचा राजीनामा मागतील" असे बेजबाबदार वक्तव्य करुन त्यांनी आपल्या लाचारी व हतबलतेचे दर्शनच घडवले आहे. फडणवीस यांना माणूस व कुत्रा यांच्यातील फरकही कळत नाही का?" महाराष्ट्रात आता कायद्याचे राज्य राहिले नाही. भाजपा सरकारमुळे महाराष्ट्र गुन्हेगारीत देशात पहिल्या नंबरवर आहे, हे NCRB च्या अहवालात म्हटले आहे. अवैध बंदुकीच्या बाबतीत नागपूरचा पहिला नंबर लागतो. त्यानंतर ठाणे, मुंबई व पुणे या शहरांचा नंबर लागतो. नागपूरच्या अधिवेशनात मी हे आकडेवारीसह मांडले होते. राज्यात खैरात वाटल्यासारखे बंदुकांचे परवाने दिले जात आहेत. तडीपार गुंडांना पोलीस संरक्षण दिले जात आहे. काही भ्रष्ट व कलंकित IPS अधिकाऱ्यांना नियम डावलून प्रमोशन दिले आहे तर प्रामाणिक व इमानदार अधिकाऱ्यांचे खच्चीकरण केले जात आहे. पोलीस दलात प्रचंड राजकीय हस्तक्षेप व दबाव असल्याने तेही काही कारवाई करू शकत नाहीत. गुंडांनी शासन व प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात अशी परिस्थिती कधीच नव्हती. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात थोडीशीही नैतिकता शिल्लक असेल, जनाची नाही तर मनाची लाज असेल तर त्यांनी राजीनामा द्यावा, असेही नाना पटोले म्हणाले. वर्षा बंगला तसेच मंत्रालयात गुडांचा वावर बिनदक्कितपणे सुरू आहे. तडीपार गुडांना राजाश्रय, पोलीस दलामधील राजकीय हस्तक्षेप व दबावामुळे पोलीसही हतबल आहेत. राज्यातील कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती चिंताजनक असून हे 'गुंडाराज' बरखास्त करुन राष्ट्रपती राजवट लागू करा, अशी मागणीही काँग्रेसकडून करण्यात आली आहे. तसेच, काँग्रेसचे शिष्टमंडळ उद्या १० फेब्रुवारी रोजी राज्यपालांची भेट घेणार आहेत.

## इकडे तिजोरीची वाट तिकडे कचरा मात्र भरमसाठ

आधुनिक केसरी



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

**स्थानिक वृत्तपत्र चाळत असताना व सोशल मीडियाचे निरीक्षण करत असताना काही बातम्या बघितल्या. एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, मागच्या पाच-सात वर्षापासून देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी स्वच्छता अभियान व स्वच्छ भारत अभियान राबविण्यासाठी जीवाचा आटापिटा करत आहेत. सर्व स्तरावरील शासकीय व प्रशासकीय यंत्रणेला कामाला लावून केंद्र व राज्यामार्फत करोडो रुपये स्थानिक स्वराज्य संस्थेला देत आहेत. देश व राज्यातील काही बोटावर मोजण्याएवढे प्रदेश व जिल्हे सोडले तर सर्वत्र स्वच्छतेचे बारा वाजल्या सारखे वाटते.**

शासन व प्रशासकीय यंत्रणेने आपापले क्षेत्र स्वच्छ ठेवावे म्हणून स्पर्धा घेऊन कोण अव्वल येतो याचा सातत्याने पाठपुरावा होत आहे. अव्वल येणाऱ्यांना बक्षिसे जाहीर केली आहेत. खरे तर आजच्या स्पर्धेच्या युगात सर्व स्तरावर प्रत्येकाने जिवापाड प्रयत्न करून असे अभियान प्रामाणिकपणे राबविले पाहिजे. पण अपवादानेच असे दिसते. आपल्या देशात व राज्यात प्रत्येकानी स्पर्धेत सहभागी होऊन अव्वल येण्याचा प्रयत्न तळमळ, पोट तिडकीने, प्रामाणिकपणे करणे गरजेचे आहे, पण आपल्याकडे अशा स्पर्धेत अव्वल येण्या ऐवजी मिळालेला शासनाचा निधी कसा फस्त करता येईल यातच शासकीय व प्रशासकीय यंत्रणा जास्त तरबेज दिसते नव्हे आहेच, हे टाळून चालणार नाही. प्रत्येक स्तरावर प्रत्येकानी स्वच्छ व निष्कलंक असणे बहुतेकांच्या मनी रुचत नाही. म्हणूनच स्थानिक स्तरावर जास्तीत जास्त मिळालेला निधी कसा जिरवावा याकडेच सर्वांचे जास्त लक्ष असते. अशा स्थितीत स्वच्छता व स्वच्छ भारत-अभियान कसे बरे राबविणार ? मराठीत म्हणतात ना "कागदी मेळ अन् हाती केळ" अशी काहीशी गत सर्वत्र दिसते. चला जाऊ उद्या, असे आपल्या देशात चालतच राहणार "कुणी निंदा कुणी वंदा सगळ काही फस्त करणे हा आमचा धंदा."

राज्याच्या स्वच्छता अभियानाची वृत्तपत्रात बातमी वाचण्यात आली. त्यात काही बोटावर मोजण्याइतकीच शहरे आढळली. आपले नांदेड या अभियानात कुठे सापडते का म्हणून पुन्हा पुन्हा दैनिक वाचला, नांदेडचा कुठेच थांगपत्ताही दिसला नाही. मनात लख्ख प्रकाश पडला, आपण नागरी समितीच्या माध्यमातून मागच्या सात-आठ वर्षापासून या अभियानात दिवस रात्र राबत आहोत. आम्ही सार्वजण नांदेडचे लोकप्रिय परखड विचाराचे दैनिक 'प्रजावाणी' नांदेड मनपातील पैसे उधळपट्टीचे रोज नवे-नवे किस्से ऐकवत आहे. त्याबद्दल प्रजावाणीने स्वच्छ बातम्या देऊन जनतेला जागृत तरी केले याबद्दल धन्यवाद. नांदेडची जनता बिचारी मुकी त्यांना कोणीही हाकी, कशाचेही सोयर-सुतक आम्हा नांदेडकरांना नाही हे मात्र नक्की. आपली नांदेड मनपा बाल्यावस्थेतून तारुण्य अवस्थेत आली, आता तरी शहाणी होईल असे वाटते. पण छे ! आम्हाला सुधरायचे नाही पण आम्हाला जे सुधारायचे शहाणपण सांगतात. त्यांना मात्र वेडे करून सोडायचे हा वसा आम्ही नांदेड मनपावाल्यांनी घेतला आहे. गुरुतागद्दी




सोहळ्यापासून नांदेड मनपा प्रशासनाने स्वच्छतेवर करोडो रुपये उधळले, पण आपले नांदेड काही मनपा प्रशासनाला म्हणावे तसे स्वच्छ करता आले नाही. एकच असलेला मुख्य रस्ता तेवढा थोडा बहुत चकचक बाकीची गल्लीबोळ मात्र अलबेलच. आमचे नागरीकृती समितीचे सदस्य व बोटावर मोजण्याएवढे स्वच्छता प्रेमी मात्र नेहमीच स्वच्छतेविषयी प्रबोधन व प्रत्यक्ष काम करून परेशान असतात. एवढी कशी निर्ढावलेली ही व्यवस्था ? बाकी मात्र जमा झालेल्या महसुलावर व मिळालेल्या शासनाच्या विविध अनुदानावर मनमुराद उधळपट्टी. कर्मचाऱ्यांची मोबाईल बीले, गुत्तेदारावर सवलती व दंड माफीचा वर्षाव, कोट्यावधीची मेहरबानी हे चित्र व असे पैसे जिरवण्याचा गोरखधंदा मनपा प्रशासन बंद करणार की नाही ? तसेच लोकप्रतिनिधी कडील लाखोरूपयांचा थकीत मालमत्ताकर सक्तीने वसूल करणार की "तेरी भी चुप मेरी भी चुप" याप्रमाणे वागून मालामाल होऊन जनतेला वाऱ्यावर सोडणार असे जनसामान्याला वाटत आहे.

मनपा प्रशासनाच्या अशा बेजबाबदार वृत्ती व शासन दुर्लक्षामुळे नांदेड मनपा पुरती कर्जबाजारी झाली आहे. मागील दीड वर्षापासून येथे प्रशासकीयराज आहे. वर्तमान आयुक्त काही प्रामाणिक शिस्तीचे पाढे गिरवतील असे वाटत होते, पण त्यांची ही अवस्था आता "ढवळ्या सोबत पवळ्या बांधला वाण नाही लागला पण गुण नक्कीच लागला" अशीच अवस्था आहे. मनपात अधीच विरोधक नावाला होते. त्यामुळे सत्ताधाऱ्यांचे फावले, एकंदरीत वर्तमान मनपातील प्रशासकीय कारकीर्द पाहता असे वाटते "हम भी अंग्रेज के जमाने के जेलर है हम नही सुधरेंगे" कसेही करून तीन वर्षाचा कारकीर्द पूर्ण करून जय रामजी की म्हणण्याची वेळ नांदेडकरांवर नक्कीच येणार.

या लेखाची सुरुवात करताना प्रसिद्ध हास्य अभिनेता असराणी यांचा शोले चित्रपटातील संवाद आठवला. अतिशय उपहासाने विनोदातून त्यांनी कायद्याची परिभाषा समोर ठेऊन कशी खिल्ली उडवीली नेमकी नांदेड मनपातील स्वच्छता विभागाची अवस्था मनपा स्वच्छता विभागाने आत्तापर्यंत जनेतेच्या पैशातून कशी करोडोंची वाट लावली व शहर स्वच्छता जशास तशी ठेवली याचा प्रत्यय आम्हा सर्वासामान्य नांदेडकरांना येतो. आमच्या नागरीकृती समितीचे सर्व सदस्य मागच्या दहा वर्षांपासून स्वच्छता-स्वच्छता म्हणून आवाज उठवत आहेत. दोन रुपयांचे कोटीचे बक्षिस मिळविण्याऱ्या आपल्या मनपाला स्वच्छते बाबत कोणत्याच प्रकारे सुधारणा करता आली नाही हे आमच्या नांदेडकरांचे दुर्भाग्य. नाकासमोरचे काढायचे अन् बाकी जशास तसे ठेवायचे. कचऱ्याचे ढिगारे गाडीत टाकण्याऐवजी जिथे रिकामी जागा दिसेल तिथे यथेच्छ कचरा टाकून आपले नांदेडकरही मोकळे होतात, अन् म्हणतात घंटा गाडी तरी नियमित येते कुठे ? एवढे करूनही बिचाऱ्या कंत्राटी कामगारांना वेतनासाठी नेहमीच अंदोलनाचे हत्यार उचलावे लागते. शेवटी ही व्यवस्था कधी सुधारणा असे जनतेला वाटते.

## नवोदय

आधुनिक केसरी



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

**संध्याकाळची वेळ होती. साधारणत: आठ वाजले होते. विराट च्या घरचे सगळे टी.व्ही.पाहत पाहत जेवण करत बसले होते. विराटच्या भावाला म्हणजे जय ला पुरणपोळ्या आवडतात म्हणून त्याच्या आईने आज आमरस व पोळ्या केल्या होत्या. विराट चे पप्पा नंतर जेवण करतो म्हणून सोप्यावर काहीतरी लिहीत बसले होते. हे सारे जेवण करत असताना पप्पांना फोन आला. तो फोन विराटच्या शाळेमधून विराटच्या माधव सरांचा होता. पप्पांनी तो फोन उचलला व म्हणाले, " हॅलो, हॅलो..!' " मी विराटच्या शाळेमधून माधव सर बोलतो." " हा नमस्कार सर, बोला, बोला सर" "अहो, सर, तुमचा मुलगा विराट हा नवोदय विद्यालयाची परीक्षा पास झाला आहे."**

**(म्ागील अंकावरून)** दुसऱ्या दिवशी सकाळीच लवकर निघायचे होते. अतुलच्या पप्पाचा रात्रीच फोन आला होता. आपण लवकर जाऊन आपला नंबर लावून व आपल्या मुलांना एकत्र खोली घेऊ. म्हणून विराट चे पप्पा, मम्मी आणि जय यांनी भराभर गाडीत सामान भरले. सगळेजण विराटला पोहोचविण्यासाठी नवोदय विद्यालयाकडे निघाले. तिथे त्या विद्यालयात जुन्या विद्यार्थ्यांची शाळा ही आता सुरू झाली होती. त्यामुळे त्या शाळेत सगळे विद्यार्थी एकदम शिस्तीत दिसत होते. शिक्षकही बाहेरच ओरंड्यात टेबल खुर्च्या टाकून बसले होते. शिक्षक आलेल्या विद्यार्थ्यांचे कागदपत्रे पालकांना तपासून देत होते. त्याचबरोबर दुपारी दोन वाजता सर्व पालकांची मीटिंग घेण्यात येणार आहे असेही सांगत होते. ज्यांचे सगळे कागदपत्र आहेत त्यांना प्राचार्या साने मॅडम व उपप्राचार्य कैद्य सर यांच्याकडे पाठवत होते. सगळे शिक्षक अगदी व्यवस्थितपणे सगळ्यांना मार्गदर्शन करत होते. विद्यार्थीही टेबल खुर्च्या लावून पालकांची अडचण सोडवत होती. सारं काही अलबेल दिसत होतं. नवीन आलेल्या विद्यार्थ्यांना हाऊस दिले जात होते. विराटला वेगळं हाऊस मिळाला होतं. विराट च्या मित्राला म्हणजे अजय अतुल ला दोघांना एकत्र मिळालं होतं. त्यामुळेही विराट नाराज झाला होता. पण त्याची नाराजी दूर केली. तेथील शिक्षकांनी सांगितले की, तुम्ही तुमच्या हाऊस मास्टर ला भेटा व त्यांना आम्ही दिलेली चिठ्ठी दाखवा. त्याप्रमाणे आम्ही हाऊस मास्टर ला भेटलो. हाऊस मास्टर ही अगदी छान बोलले. त्यांची ओळख झाली. त्यांचा फोन नंबरही घेतला. त्यांनी सांगितले की तुम्ही आता हाऊस मध्ये जाऊन या तिथे एक सर्व विद्यार्थी तुम्हाला मदत करतील. नंतर आम्ही हाऊस मध्ये गेलो. नंतर हाऊस मध्ये त्याचे सामान व्यवस्थित लावले. त्याला गादी, बेडशीट, चादर, ताट व इतर वस्तूही देण्यात आल्या. ते त्याला व्यवस्थित लावून दिले. तिथला पंखा बंद होता. त्याविषयी हाऊस मास्टरलाही सांगण्यात आले. तिथे राहणाऱ्या विद्यार्थ्यांनीही सहकार्य केले. हे सार बघून खूप आनंद वाटला. दुपारी दोन वाजता आयोजित केलेली प्राचार्यांची सभा पाच वाजता सुरू झाली. पालकांना बसण्याचे व्यवस्थित प्रकारचे काही नियोजन केलेले दिसत नव्हते. त्या सभेत प्राचार्यां साने यांनी व उपप्राचार्य कैद्य यांनी खूप चांगले मार्गदर्शन करून विद्यार्थी आणि पालकांचा विश्वास कमावला. सुरुवातीला विद्यार्थ्यांना महिन्यातून प्रत्येक रविवारी तुम्ही भेटायला येऊ शकता नंतर मात्र महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी तुम्हाला भेटता येईल असे त्यांनी सांगितले.त्यांच्या बोलण्यातून विद्यार्थ्यांच्या मनात व पालकांच्या मनात जे विविध प्रश्नांचे, अडचणीचे मोहोळ तयार झाले होते त्यांचा गुंता सुटला गेला. अगोदरच्या काही पालकांनी शाळेच्या व्यवस्थापनाविषयी व तेथील वातावरणात विषयीच्या शंका उपस्थित केल्या होत्या त्याही आमच्या मनातून आपोआप गळून पडल्या होत्या. त्यामुळेही त्यांच्याविषयी आपुलकी निर्माण झाली. पुन्हा शेवटी निघताना विराटला मम्मी,पप्पा व जय ने हाऊस मध्ये सोडले व परतीच्या प्रवासासाठी निघाले. विराट मात्र तेवढा दुःखी वाटला नाही. राहण्याचा निर्णय त्यांनी स्वतः घेतला होता. जयचा चेहरा मात्र सगळा उतरून गेला होता. विराटला त्याच्या मम्मी पप्पा ने कधीच एक दिवसही कुठेच ठेवले नव्हते. ही त्याची पहिलीच वेळ होती. शेवटी विराट ला नवोदय विद्यालयात सोडून सर्व घराकडे निघाले होते. रस्त्यात एका हॉटेलवर गाडी थांबवली. जेवणाची कोणाचीच इच्छा नव्हती. जेवण करू वाटत नव्हते. पण उपाशी तरी कसे झोपणार म्हणून थोडं खावं लागणार होतं. **क्रमशः**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अनेक वर्षानंतर विनोद वाईन शॉपवर मोठा निर्णय!

## आंबेडकरी समाजाच्या आंदोलनाला व उपोषणाला यश

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यामागील विनोद वाईन शॉप स्थलांतरीत करावे, या मागणीसाठी आझाद समाज पार्टीचे आनंद लोंढे सह समाजातील सर्व आंबेडकरी जनतेच्या आंदोलनाला अखेर यश आले आहे.

राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराजे देसाई यांनी काल विनोद वाईप शॉप दहा दिवस बंद करण्यासह या कालावधीत दुकान स्थलांतरीत करावे, असे आदेश दिले. त्यामुळे आनंद लोंढे यांनी तुर्तास उपोषण मागे घेतले आहे.

आ. फारूक शाह व राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक राजेश धनवटे यांनी लोंढे यांना ज्युस देवून त्यांचे उपोषण सोडले विनोद वाईप शॉप आ स्थलांतरीत करावे, या मागणीसाठी आझाद समाज पार्टीच्या माध्यमातून गेल्या तीन महिन्यांपासून आंदोलन सुरू होते. १ फेब्रुवारीपासून आनंद लोंढेंसह सात जण आमरण उपोषणाला बसले होते. या उपोषणस्थळी आंबेडकरी समाज रस्त्यावर उतरले होते.नेते, तरूण, विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसह फारूक शाह यांनी समर्थन दिले होते. त्यानुसार त्यांनी ना. शंभूराजे देसाई यांच्याकडे बैठक लावण्याची आश्वासन दिले होते. त्यानुसार दि. ८ रोजी ना. देसाई यांच्या मुंबई येथील दालनात बैठक घेण्यात आली. त्यात व्हीडीओ कॉन्फरन्सव्दारे पोलिस अधिक्षक, उपोषणकर्ते व्हीडीओ कॉन्फरन्सव्दारे सहभागी झाले होते. बैठकीत उपोषणकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पावित्र्य राखणे हेच शासनाचे प्रथम कर्तव्य आहे, असे सांगितले. त्यानंतर ना. देसाई यांनी विनोद वाईप शॉप या तर दुकानधारकास दहा दिवस दुकान बंद करण्याचे आदेश देवून दरम्यानच्या कालावधीत जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक व राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या निरीक्षकांनी वाईन शॉपधारकाशी चर्चा करून दुकान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ५० मीटर अंतरावर इतर ठिकाणी किंवा अन्यत्र स्थलांतरीत करावे, असे आदेश दिले त्यानुसार आनंद लोंढे सह उपोषणकर्त्यांनी उपोषण तूर्तास घेतले. तसेच दहा दिवसांच्या आत कार्यवाही न झाल्यास पुन्हा स्थगित केलेले उपोषण तीव्र करू, असा इशाराही उपोषणकर्ते आनंद लोंढे, रविंद्र वाघ, आबा अमृतसागर, मुकेश वाघ, चिंतामण थोरात, दावल वाघ, किरण भालेराव यांनी दिला आहे. याप्रसंगी आंदोलनाला पाठींबा देणारे आ. फारूक शाह यांच्यासह ॲड. विशाल साळवे, माजी नगरसेवक जितु शिरसाठ, आनंद सैंदाणे, मुकुंद शिरसाठ, मुकेश खरात, संजय अहिरे, निशांत मोरे, सिध्दार्थ जगदेव, देविदास जगताप, कल्याण गरुड,



महेंद्र शिरसाठ, राज चव्हाण, दिलीप भामरे, मनी खैरनार, ज्ञानेश्वर भामरे, चंद्रकांत सत्तेसा, रत्नशिल सोनवणे, विलास मोहिते, मंगलदास वाघ, संजय सरदार, पुरुषोत्तम गरुड, नाना थोरात, दुर्योधन पाटील, चेतन गायकवाड, संजय चव्हाण, सुरेश अहिरे, वाल्मीक जाधव, रंजना इंगळे, नासीर पठाण, इकबाल शाह, आसिफ शाह, अफसर शाह, ॲड. शितल जावरे, आकाश सोनवणे, डॉ. दिपश्री नाईक, श्री झाल्टे, आनंद दामोदर, दिलीप मोहिते, ॲड. संतोष जाधव, भैय्या पारेराव, दिनेश निकुंभ, ईश्वर वाघ, कवी जावरे, आप्पा साळवे, सोनूबाई सावकारे, निर्मलाबाई साळवे आदी उपस्थित होते.

# स्वामी महाराज रौप्य महोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यात डॉ. विधाते यांचे व्हायोलिन वादन

आधुनिक केसरी न्यूज

**गणेशवाडी :** नेवासा तालुक्यातील बेल्हेकरवाडी येथे परमपूज्य अण्णा महाराज यांनी स्थापन केलेले रेणुका माता मंदिरात छत्रपती संभाजीनगर येथील युवा कलावंत डॉ.सुरेश विधाते यांचे व्हायोलिन वादन सकाळच्या मंगल प्रभात समयी त्यांनी आपल्या खास शैलीमध्ये व्हायोलीनच्या तारा छेडल्या व आलेल्या रसिक भक्तांना वेगळ्या भावविश्वाची सैर घडवली. योगीराज हंसतीर्थ स्वामी महाराज रौप्य महोत्सवी पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन पंचदिनात्मक पुण्यतिथी उत्सव हा बेल्हेकरवाडी येथे महाराजांची समाधी स्थळी संपन्न होत आहे. या कार्यक्रमातच डॉ सुरेश विधाते हे छत्रपती संभाजीनगर येथील कलावंत असून कंठ संगीत. हार्मोनियम. तबला या विषयात त्यांनी अ.भा.गां.महाविद्यालयाची संगीत अलंकार ही पदवी प्राप्त केलेली आहे.त्याबरोबरच संगीत विषयात डॉक्टरेट ही पदवीही त्यांनी प्राप्त केलेली असून व्हायोलिन या अत्यंत दुर्मिळ वाद्य प्रकारात त्यांनी विशारद ही पदवी प्राप्त केलेली आहे.छत्रपती संभाजीनगर येथे श्रद्धा संगीत विद्यालयाच्या



माध्यमातून संगीताचे प्रचार व प्रसाराचे कार्य ते करत असतात.ग्रीनलँड ग्लोबल स्कूलचे ते संस्थापक संचालक असून शाळेचे प्राचार्य पदाची धुराही सांभाळत आहेत.श्री गुरुदेव दत्तपीठ श्रीक्षेत्र देवगड संस्थान येथे श्रीदत्त जन्मोत्सवा निमित्ताने दरवर्षी मनोभावे सुरेश विधाते हे आपली कला सादर करत असतात. डॉक्टर सुरेश विधाते यांना तबल्यावर श्री कृष्णकुमार विधाते यांनी साथसंगत केली. व्हायोलिन सचिन पवार उपस्थित सर्व मान्यवर कलावंतांचा सन्मान हा छत्रपती संभाजीनगर येथील परमपूज्य अनिरुद्ध गुरुजी यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. मठाधीश यज्ञेश्वर महाराज संस्थांनातील पूजनीय संत महंत भावीक भक्तांची मोठी उपस्थिती होती.



# वारसास दोन लाखांचा विमा धनादेश प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** शनिशिंगनापुर येथील पुरोहित श्रीकांत मधुकर जोशी यांचे नगरहून येताना अपघाती मृत्यु झाला होता. त्यांचे खाते शनिशिंगनापुर येथील युको बँकेत होते. त्यांना रुपे एटीएम कार्ड देण्यात आले होते. बैंकिंग धोरणानुसार खातेदारचा विमा उतरला जात असल्यामुळे त्यांच्या वारसाला 2 लाख रुपयाचा धनादेश पत्नी मानसी जोशी यांना व्यवस्थापक राहुल लेकुरवाळे यांच्या हस्ते देण्यात आले. याबाबत खातेदाराला काहीच माहिती नसते म्हणून तात्काळ व्यवस्थापक लेकुरवाळे यांनी त्यांची सर्व माहिती घेऊन संपर्क केला, पूर्ण माहिती कुटुबाला देण्यात आली. बैंकचे सहव्यवस्थापक श्री. हनुमू खेतावत यांनी टाटा ATG कंपनीकडे वेलोवेळी पाठपुरवा करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावलीने अवघ्या दोनच महिन्यात वारस विमा रक्कम मिळाली.बैंकने या प्रकरणाचा तातडीने पाठपुरावा केल्याने सर्वत्र बैंकचे कौतुक होत आहे.

# टू व्हीलरच्या धडकेत महिला जागीच ठार

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** अकोला खुर्द खांडवी रोडवर टु व्हिलर ने दिलेल्या धडकेत अकोला खुर्द येथील इंदुबाई पुंजाजी हेलोडे वय ६० यांचा जागीच मृत्यू झाला झाल्याची घटना ९ फेब्रुवारी रोजी अकोला खुर्द रोडवर घडली. मिळालेल्या प्राप्त माहितीनुसार इंदुबाई अकोला खुर्द-खांडवी रोडवर गावाच्या लगतच ह्या बकऱ्या चारत होत्या. दरम्यान खांडवी वरून भेंडवळकडे भरधाव जात असताना अकोला खुर्द गावाजवळ रोडनजीक इंदुबाई ह्या बकऱ्या चारत होत्या.बकऱ्यांना हाकलन्यासाठी त्या रोड कॉस करतांना त्यांना दुचाकीने उडवून दिले.त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# एसटी बस व ट्रकचा भीषण अपघात, एक ठार, 20 जण जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**अपघातातील जखमी :** सुजित दयराम अंभोरे वय 23, रा .सुकळी ता .पातुर जि .अकोला, निलेश विजय तायडे वय 38 रा .संभापूर ता .खामगाव, महेश गंगाराम माकर वय 46 रा .रांजनगाव एसटी वाहक,प्रशांत सुदर्शन काकडे रा .अहमदनगर, हरगुडे ( चालक ) रा .सनदवाडी ता .शिरुर, हरगुडे ( चालक ) रा .सनसवाडी ता .शिरुर, शोभना लक्ष्मण चंदनकर वय 45 रा .धोडप ता .रिसोड, रोहिणी दत्ता राजगुरु वय 24, बेबी दत्ता राजगुरु वय 43 दोन्ही रा .देऊळगाव माळी ता .मेहकर, सत्यभामा रामकिसन उंबरकर वय 65 रा .बोडखे, ता .रिसोड, वृषाली दिलीप वैद्यपाठक, उज्वला दिलीप वैद्यपाठक दोन्ही रा .पुणे व सौ .अश्विनी निळकंठ जोशी रा .पुणे

**खामगाव :** जालना- चिखली मार्गावर आज 9 फेब्रुवारीच्या पहाटे ओव्हर टेकच्या नादात समोरील ट्रकला पुणे-शेगाव बसची धडक बसून अपघात झाला. यात एक प्रवाशी ठार झाला तर 20 जण जखमी झाले. आंढेरा नजीक राम नगर फाट्यावर हा अपघात घडला. चिखली ते मेरा खु दरम्यान असलेल्या रामनगर फाट्याजवळ एसटी बस आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. ट्रॅव्हल ला ओव्हरटेक करण्याच्या नादात महाराष्ट्र परिवहन महामंडळाची शयनयान बस ट्रॅव्हल समोर असलेल्या ट्रकला मागून धडकली. या अपघातात एसटी बस चालकाचे पाय मोडके असून एका 25 वर्षीय प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला तर 15 ते 16 जण जखमी आहेत. आज, 9 फेब्रुवारीच्या पहाटे 5 वाजेच्या सुमारास हा अपघात झाला. एम एच 14, एल बी 0544 क्रमांकाची महाराष्ट्र परिवहन महामंडळाची दोन महिन्यांपूर्वी नव्याने सुरू झालेली पुणे ते शेगाव ही शयनयान बस पुण्यावरून शेगावला येत होती. रामनगर फाट्याजवळ खाजगी ट्रॅव्हल ला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्न करीत असताना ट्रॅव्हलसमोर आलेला मालवाहू ट्रक अचानक लेन बदलून एसटी बसच्या समोर आला, एसटी बस ओव्हरटेक करीत असल्याने वेगात होती, ती साखरेची वाहतूक करीत असलेल्या ट्रकला मागील बाजूस धडकली. या भीषण अपघातात बसच्या समोरील भागाचे मोठे नुकसान झाले. बस चालकाचे दोन्ही पाय मोडल्याचे सांगण्यात येत आहे. एक प्रवाशी जागीच ठार झाला असून तो खामगाव तालुक्यातील रहिवाशी आहे. 15 ते 17 प्रवाशी जखमी असून सर्वांना पुढील उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच





अंढेरा पोलिस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील व सहकारी घटनास्थळी दाखल झाले. सर्व गंभीर जख्मी प्रवाशांना चिखली येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून गंभीर जखमी प्रवाशांना चिखली येथील खाजगी हास्पीटलमध्ये भरती केले आहे. अपघातामुळे झालेली वाहतूक कोंडी फोडून एका बाजूने वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे. अपघाताची माहिती मिळताच आंचरवाडी,रामनगर,मेरा खुर्द येथील नागरिकांनी जखमींना बाहेर काढत उपचारासाठी चिखली येथे पाठवले. यावेळी पीएसआय हरिहर गोरे व गोरख राठोड,मोंरसिंग राठोड, अरुण खार्डे, रामेश्वर आंधळे,हे कर्मचारी हजर होते. आज 9 फेब्रुवारीची सकाळ जिल्हावासीयांची झोप उडवणारीच ठरली.. सकाळी चिखली देऊळगावराजा रोडवरील रामनगर फाट्याजवळ पुणे - शेगाव या एसटी महामंडळात नव्याने सुरू झालेल्या शयनयान गाडीचा ट्रकला मागील बाजूस धडकून अपघात झाला. या भीषण अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला तर 15 ते 16 प्रवाशी जखमी झाले. सिद्धार्थ अर्जुन सुरवाडे (30, रा. बोरीअडगाव, ता. खामगाव ) असे अपघातात ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे. 7 महिन्यांपूर्वी सिद्धार्थचे लग्न झाले होते. 7 फेब्रुवारीला सिद्धार्थ मित्र निलेश तायडे याच्यासोबत पुण्याला गेला होता. काल सकाळी पुण्यात पोहचल्यानंतर दिवसभरात काम आटोपून 10 वाजता ते पुण्याहून परतीला निघाले होते. मात्र नियतीच्या मनात वेगळेच होते, आज पहाटे रामनगर फाट्याजवळ अपघात होऊन सिद्धार्थचा मृत्यू झाला. सिद्धार्थच्या वडिलांचे अकाली निधन झालेले आहे. गेल्या वर्षी सिद्धार्थच्या लहान भावाचेही अपघाती निधन झाले होते, सिद्धार्थचा भाऊ श्रीकांत हा भारतीय सैन्यात होता.

# शासकीय योजना नागरिकांपर्यंत पोहोचल्याने पोटदुखी

## बहादरपूरचे सरपंच गोपीनाथ रहाणे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** गल्लीपासून दिल्लीपर्यंत सत्ता असतांना कोपरगावच्या माजी आमदारांनी कुठल्याही योजनांचा लाभ नागरिकांना मिळवून दिला नाही.याउलट आ.आशुतोष काळे यांनी तीन वर्षात शासनाच्या विविध योजनांचा लाभ कोपरगाव तालुक्यातील हजारो गरजू लाभार्थ्यांना मिळवून दिला आहे. त्यामुळेच विरोधकांना खरी विरोधकांची पोटदुखी सुरु झाली असल्याचे प्रतिपादन बहादरपुरचे सरपंच गोपीनाथ रहाणे यांनी विवेक कोल्हे यांचे नाव घेऊन केली आहे.

त्यांनी प्रसिध्दी पत्रकात पुढे म्हटले आहे की,सन-२०१४ ते २०१९ मध्ये माजी आमदारांकडे सर्व प्रकारची सत्ता असतांना देखील या पाच वर्षात संजय गांधी निराधार

> **माजी आ .कोल्हे यांना योजना समजण्यात पाच वर्ष खर्ची पडले :** माजी आ .कोल्हे यांच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात शासनाच्या योजनांचा लाभ मिळालेले दोन हजार लाभार्थी व आ .आशुतोष काळे यांच्या तीन वर्षाच्या कार्यकाळात शासनाच्या योजनांचा लाभ मिळालेले आठ हजार लाभार्थी असून या आकडेवारीत जमीन-अस्मानाचा फरक आहे . **सरपंच गोपीनाथ राहणे**

योजना,श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना,इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती योजना अशा सर्व योजना मिळून कोपरगाव तालुक्यातील केवळ दोन हजार दोनशे अकरा लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे.याउलट ३ जानेवारी २०२० ते १६ ऑक्टोबर २०२३ पर्यंत संजय गांधी निराधार योजना,श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना,इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती योजना या योजनांचा कोपरगाव तालुक्यातील ८ हजार ५६५ लाभार्थ्यांना आ.काळे यांनी लाभ मिळवून दिला असून येत्या काही दिवसात अजूनही १ हजार लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ मिळणार आहे.

ज्यांच्या कार्यकाळात गरजू लाभार्थ्यांना या योजनांचा अत्यल्प लाभ मिळाला त्याच्या चारपट लाभ आ.काळे यांनी तीन वर्षात गरजू लाभार्थ्यांना मिळवून दिला हे शासकीय आकडेवारी सांगते. तुमच्याकडे पाच वर्ष सत्ता असतांना जर दोनच हजार लाभार्थ्यांना लाभ मिळाला याउलट चार वर्षात हाच आकडा चार पटीने वाढला आहे यावरून मोठ्या प्रमाणात लाभाच्या योजनांपासून वंचित असणाऱ्या हजारो लाभार्थ्यांना पंचायत समिति,तहसील कार्यालयाच्या माध्यमातून जास्तीत जास्त शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला असून यापुढील काळातही सर्वच पात्र लाभार्थ्यांना अशा योजनांचा लाभ मिळणार आहे. रेशन कार्ड धारकांना नियमित अन्न धान्य पुरवठा व्हावा याबाबत आ.काळे यांचे योग्य नियोजन सुरु असून रेशन कार्ड ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी देखील त्यांनी स्वतःची यंत्रणा उभी केली आहे.

मात्र नेहमीच राजकीय आकसापोटी नागरिकांची दिशाभूल करून नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याची ज्यांना सवय आहे त्यांनी निळवंडेच्या पाण्याच्या बाबतीत देखील संभ्रम निर्माण करून दुष्काळी गावातील नागरिकांना वेड्यात काढुन ५३ वर्ष शेती सिंचनाचे पाणी मिळून दिले नाही.मात्र याउलट आ.काळे यांनी निळवंडे डाव्या कालव्याचे पाणी कालवा कृती समितीच्या माध्यमातून दुष्काळी भागात आल्यावर जलपूजन केलं आहे.मात्र पिण्याचे पाणी लाभक्षेत्राबाहेर नेण्याचे पातक माजी आ.कोल्हे यांनी नेहमीच केले आहे.व वर्तमानात उच्च न्यायालयाच्या माध्यमातून सुरु आहे.तरीही नेहमीप्रमाणे कोणतेही योगदान नसतांना माजी आ.कोल्हे यांनी जलपूजन करून श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न केला होता.मात्र तर तळेगाव दिघे येथील काही शेतकऱ्यांनी काही श्रेयवाद्यांना त्यांना पिटाळून लावले होते त्याची जिल्ह्यात मोठी चर्चा झाली होती.कोणत्याही विकास कामात राजकारण करायचे हि त्यांची जुनी खोड असून योगदान नसतांना श्रेय घेण्यासाठी सर्वात पुढे राहून जनतेत संभ्रम निर्माण करीत असले तरी जनता त्यांना चांगलीच ओळखून असल्याचे गोपीनाथ रहाणे यांनी शेवटी म्हटले आहे.



# संजनाताई जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त जामडी शाळेत मुलांना पुस्तकांचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**चिंचोली :** कन्नड तालुक्यातील चिंचोली लिंबाजी येथील जवळ असलेल्या जामडी जाहंगीर जिल्हा परिषद शाळेच्या संपूर्ण विद्यार्थ्यास भावी आमदार संजना ताई जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय वस्तूंचे वाटप मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळेस सरपंच श्री दिनकर खरात, उपसरपंच शंकर जैस्वाल शालेय समिती अध्यक्ष अनिल सोळंके संजनाताई मित्र मंडळाचे अध्यक्ष दिनकर भाऊ देवरे, सचिव श्रीविष्णू मामा सपकाळ व उपाध्यक्ष महादू वाघ, छगन राऊत, देवर, योगेश बोरसे, कारभारी पवार, चेअरमन राजेंद्र देवरे, प्रभाकर काळे, संतोष काळे, पांडुरंग आनंदा राऊत, हरिदास खरात, गजू सोनवणे, देविदास सोनवणे, पुजाराम ताठे, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालकमंत्री प्रा. डॉ. सावंत यांच्या प्रयत्नामुळे प्रारूप आराखड्यासाठी 408 कोटींची तरतूद

आधुनिक केसरी न्यूज



**धाराशिव :** जिल्हा आकांक्षित असून जिल्ह्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी तसेच दुष्काळग्रस्त असल्याने पाणीटंचाई आहे. 10 ते 12 टक्केच पाणीसाठा आहे. जनावरांना चारा टंचाई जाणवत असल्याने चारा छावण्या तात्काळ सुरू करण्यासाठी सन 2024-25 यावर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेत 350 ते 400 कोटींची आवश्यकता असल्याची विनंती पालकमंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांनी मागील महिन्यात राज्यस्तरीय बैठकीत व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून वित्त नियोजन मंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांना केली. पालकमंत्र्यांच्या या प्रयत्नामुळे जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 च्या प्रारूप आराखड्यासाठी शासनाने 408 कोटी रुपयांची तरतूद मंजूर केली आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 चा प्रारूप आराखडा अंतिम करण्यासाठी 10 जानेवारी 2024 रोजी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथे व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून राज्यस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांनी जिल्ह्याचे प्रभावीपणे सादरीकरण करून वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांना सांगितले की,जिल्हा आकांक्षित आहे.जिल्ह्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे.जिल्हा देशात तिसऱ्या क्रमांकाचा मागासलेला व दुष्काळग्रस्त आहे.जिल्ह्यात प्रामुख्याने पाणीटंचाई असून यंदा एकूण 10 ते 12 टक्केच पाणीसाठा उपलब्ध आहे. जनावरांना देखील चारा टंचाई जाणवत आहे. जनावरांसाठी चारा छावण्यास सुरू करण्याची तात्काळ आवश्यकता आहे. तसेच जिल्ह्याकरीता सन 2024-25 या वर्षाकरिता अतिरिक्त 350 ते 400 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. याशिवाय जिल्ह्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी जिल्ह्याला भरीव वाढीव तरतूद करून द्यावी,अशी विनंती पालकमंत्री प्रा.डॉ.सावंत यांनी राज्यस्तरीय बैठकीत जिल्हाधिकारी कार्यालयातून व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांना केली.तसेच जिल्हाधिकारी डॉ.ओंबासे यांनी आराखड्याचे सादरीकरण केले.पालकमंत्री प्रा. डॉ.तानाजीराव सावंत यांच्या प्रयत्नामुळे जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 यावर्षीच्या जिल्ह्याच्या प्रारूप आराखड्यासाठी एकूण ४०८ कोटी रुपयांची तरतूद मंजूर केल्याचे उपसचिव, वित्त व नियोजन यांनी कळविले आहे.



# संत भक्तांचा उद्धार करतात : ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकेकर

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** मानवी जीवन सुखदुःखाने भरलेले आहे. त्यामुळे आनंदी जीवन जगायचं असेल ग्रंथांशी मैत्री करून भगवंताचे नामस्मरण केले पाहिजे. काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मस्सर या षंढरीपुपासून दूर राहिले पाहिजे. त्यासाठी संतांचा सहवास महत्त्वाचा आहे.इतरांच्या जीवनात दुःख येऊ नयेत अशी त्यांची धारणा असते. ज्ञान, अनुभव आणि भक्तीच्या जोरावर संत भक्तांचा उद्धार करत असतात, असे प्रतिपादन ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकेकर यांनी केले. श्रीक्षेत्र राजूर येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्त कीर्तन सेवेचे तिसरे पुष्प गुंफतांना बोलत होते.

पुढे बोलताना जळकेकर महाराज म्हणाले की देव हा चराचरात वसला आहे. प्रभू श्रीराम हे आपले आदर्श आहेत. रामाचे अधिष्ठान सर्वांचे हृदयात आहे. रामनाम घ्यावयाचे असेल तर भावना महत्वाची. कारण जिथं भाव असतो तिथचं देव असतो .वारकरी संप्रदाय वेल आहे. भक्तीरुपाणे तो गगनावरी पोचलाय आहे. संत हे स्वतः वेदना सहन करतात व भक्तांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करतात.

प्रत्येक व्यक्तीमध्ये काही सद्गुण दडलेले असतात. ते आपणास ओळखता आले पाहिजे. देव, देश, धर्म टिकवण्यासाठी तरुणांनी पुढे आले पाहिजे. आपल्या पूर्वजांची इच्छा होती की, आयोध्यानगरीत भव्य राम मंदिर झाले पाहिजे. मंदिर उभारल्याचे सुख आज आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. चंद्र,सूर्य,तारे असेपर्यंत प्रभू श्रीराराचे मंदिर अस्तित्वात राहणार आहे. भविष्यात अयोध्या ही देशाची सांस्कृतिक राजधानी म्हणूनओळखली जाणार असल्याचे मत जोगळेकर महाराज यांनी व्यक्त केले. माणसाने आयुष्यात पद, पैसा, प्रसिद्धी, विद्वत्ता, सौंदर्य याचा गर्व करू नये. प्रेताला शृंगार करू नये. समाजात चांगले काम करत असतांनाही लोकं विरोध करतात. त्याचा विचार न करता कार्य करत रहा. कमी बोला, संयम ठेवा, लोकांशी संवाद साधा.मागील पन्नास वर्षांमध्ये आपण कीर्तनकार निर्माण केले परंतु एकही प्रभावी वक्ता निर्माण करू शकलो नाही ही शोकांतिकाच म्हणावी लागेल.ताकद संपली की समाज फिरकूनही पहात नाही अशी खंत महाराजांनी व्यक्त केली. साधनांचा वापर वाढला आणि विचार हद्दपार झाले. येणाऱ्या काळात आम्हाला सांस्कृतिक वारसा टिकवायचा असेल तर प्रभावी वक्ते घडवावे लागतील तरच वारकरी संप्रदाय टिकेल असे हभप ज्ञानेश्वर महाराज जळकेकर म्हणाले.शेवटी सप्ताह संयोजन समितीच्या वतीने विष्णू महाराज सास्ते यांनी सर्वांचे आभार मानले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# वेळीच प्रसंगावधान दाखवल्याने टळला बिबट्याचा हल्ला

## अजिंठा वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा; संभाजी पवार यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील रवळा व जवळा इथं काही शेतकऱ्यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळं बिबट्याचा हल्ला टळला आहे. या संभाजी राजपूत शेतकऱ्यांच्या धाडसाचं कौतुक होत आहे.शेतकरी संभाजी पवार हे दि.८/२/२४ ला रात्री शेत गट नंबर ६८ हरभरा या पिकाला पाणी देण्यासाठी गेले असता रात्रीच्या वेळी पिकांना पाणी देण्यासाठी शेतात गेलेल्या शेतकऱ्याच्या दिशेने एक बिबट्या आला. तो शेतकऱ्यावर हल्ला करणारच होता.बिबट्याचे अंतर व शेतकरी यांचे अंतर फक्त चार फूट राहिले होते मात्र, संभाजी पवार या शेतकऱ्याने प्रसंगावधान राखले. इतर शेतकऱ्यांना मदतीसाठी आवाज दिला. त्यानंतर शेतकऱ्यांनी केलेल्या एका युक्तीमुळे हल्ला करण्याच्या प्रयत्नात असलेला बिबट्या पळून गेला आणि शेतकरी थोडक्यात बचावला. दिवसा वीज नसल्याने अनेक भागांत शेतकऱ्यांना रात्री शेतात जावे लागत आहे. त्यानुसार रवळा येथे संभाजी पवार हे शेतात पिकांना पाणी देत होते. त्यावेळी संभाजी पवार यांना एक बिबट्या त्यांच्या दिशेने चाल करून येत असल्याचे दिसले. त्यांच्या हातात बॅटरी होती. पवार यांनी प्रसंगावधान राखून बॅटरीचा फोकस बिबट्याच्या डोळ्यावर मारला. त्यामुळे बिबट्या थबकला. तोपर्यंत त्यांनी इतर शेतकऱ्यांना मोठमोठ्याने हाका मारल्या. त्यामुळे शेजारील शेतात काम करीत असलेले शेतकरीही सावध झाले. आश्रिवन पवार, दिनेश जाधव,कुणाल पवार, नंदू पवार मदतीला धावून आले. त्यांनी आणखी एक युक्ती केली. तेथे जवळच ट्रॅक्टर होता. शेतकऱ्यांनी तो सुरू केला आणि बिबट्याच्या दिशेने वळवून त्याच्या दिव्यांचा फोकस बिबट्याकडे वळविला. त्यामुळे बिबट्या गांगरून गेला. आवाज ऐकून आणि फोकस पाहून काही वेळात त्याने तेथून पळ काढला. त्यामुळे शेतकरी संभाजी पवार यांची सुटका झाली.

**वनविभागाला सूचना देऊनही झोपेचे सोंग :**
रवळा, जावळा परिसरात कधी पासून बिबट्याचा वावर वाढला असून शेतकऱ्यांनी अजिंठा वनपरिक्षेत्राचे अधिकारी निलेश सोनवणे यांच्याकडे वेळोवेळी फोन केले लेखी निवेदनाद्वारे निवेदन शुद्धा देण्यात आले आहे .परतू अजिंठा वनविभागाने जाणूनबुजून झोपेचे सोंग घेऊन वेळ मारुन नेत आहे .वन विभागाने या परिसरात पिंजरा आणून बिबट्याचा बंदोबस्त करावा कारण बिबट्या मुळे शेतकऱ्यांमधे भितीचे वातावरण निर्माण झाले आहे अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे .
**संभाजी पवार , भाजपाचे सामाजिक कार्यकर्ते ,रवळा, ता . सोयगाव**





# लोणी बु. येथे माता रमाई जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील लोणी बू. येथे दिनाक 7 फेब्रुवारी रोजी सकाळी 10 वाजता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक सभागृहात माता रमाई यांची जयंती साजरी करण्यात आली. माता रमाई यांनी आपल्या जीवनामध्ये हाल अपेष्ठा सहन करुन बाबासाहेबाना शिक्षण शिकवल आणि कष्टाने संसार फुलवला बाबासाहेब आंबेडकराना साथ दिली.आपला समाज हा उपेक्षित असून समाज हा पुढे गेला पाहिजे असे त्यांचे धोरण होते.महा मानवांच्या जयंतीच्या निमित्ताने आपण महामांनवांचे विचार आमलात आणणे आजच्या तरुण पिढीने शिक्षण घेतले पाहिजे. माता रमाई यांनी त्याग केला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला जगातील सर्वात मोठे संविधान दिले यामधे जर सिंहाचा वाटा आहे तो म्हणजेच माता रमाई यांचा . देश स्वतंत्र झाला त्याच पध्दतीने रमाई ने त्याग केले म्हणून बाबासाहेब जगात प्रसिद्ध झाले.यावेळी मोठ्या संख्येने शालवृक्ष धम्म महिला संघाच्या सदस्या तसेच ग्राम पंचायत चे माजी उपसरपंच अरविंद इंगोले,सदस्य रामेश्वर टकले, विनोद बोडखे, भास्करराव नरवाडे,सुभाष इंगोले, समाधान इंगोले, पंडित इंगोले,अमोल इंगोले,पेंटर पराडे,बाळू तूरेराव यांच्यासह बहुसंख्य महिला, पुरुष यावेळी उपस्थित होते.

# विद्यमान आमदारांनी मतदारसंघात लक्ष घालावे : माजी आ. भांबळे

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** जिंतूर व सेलू तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाने पाठ फिरवल्यामुळे विविध मागण्या मंजूर करण्यासाठी मा.आ.विजयराव भांबळे यांच्या नेतृत्वाखाली दि.०६ रोजी राष्ट्रवादी जनसंपर्क कार्यालय येलदरी रोड जिंतूर येथून तहसील कार्यालय जिंतूर येथे "शेतकरी आक्रोश मोर्चा" काढण्यात आला. यावेळी व्यासपीठावर प्रसादराव बुधवंत यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर अशोक नाना काकडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रेक्षा दिदी भांबळे यांनी आपले मत मांडताना अकार्यक्षम आमदार यांच्या नाकर्ते पनावर बोट ठेवले.

अध्यक्षीय कार्यक्रमात मा आ विजयराव भांबळे यांनी शेतकरी यांना संबोधित करताना जिंतूर व सेलू तालुक्यात चालू वर्षात कमी पाऊस झाल्या मुळे शेतकरी राजा आडचणीत आला आहे. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव नाही, झालेल्या शेतीपिकाची नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही तसेच पिक विमा देखील मंजूर करण्यात आलेला नाही, सध्या जिल्ह्यातील कोरडा दुष्काळ पाहता पाणी टंचाई, चारा छावण्या, पुरेसी वीज ई. नियोजन करणे गरजेचे आहे शासनाची शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत उदासीन भूमिका दिसून येते. जिंतूर व सेलू तालुक्यात भीषण दुष्काळ असताना देखील शासनाने सौम्य दुष्काळ जाहीर केलेला आहे. दुष्काळाची परिस्थिती तरी सौम्य दुष्काळ नसून तीव्र दुष्काळ जाहीर करण्यात यावा व तीव्र दुष्काळाच्या सर्व आर्थिक मदती व दुष्काळ काळातील सर्व कामे युद्ध पातळीवर सुरु करण्यात यावे. सद्य परिस्थितीत चालू वर्षात पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे सोयाबीन व कापूस उत्पन्नाचे प्रमाण कमी झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा या करिता शासनाने सोयाबीनला ८,०००/- रु व कापूस पिकास १२,०००/- रु दराने खरेदी करण्यासाठी आदेश काढावे किंवा शासकीय खरेदीकेंद्र चालू करण्यात यावेत. सन २०२१-२२ च्या ऑगष्ट महिन्यामधील सततच्या पावसाने नुकसान झाल्यामुळे शासनाकडून १३,६००/- रु एवढी प्रति हे. अशी मदत जाहीर करण्यात आली होती. परंतु, जिंतूर तालुक्यात शेतकऱ्यांच्या खात्यावर तुटपुंजी रक्कम देऊन शेतकऱ्याची फसवणूक झालेली आहे त्यामुळे उर्वरित रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी. मागील वर्षीचा व यावर्षीचा सन २०२३ – २४ चा पिक विमा शेतकऱ्यांना देण्यात आलेला नाही तो तात्काळ मंजूर करून शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करण्यात यावा. जिंतूर व सेलू तालुक्यातील शेतकऱ्यांनी इन्शुरन्स कंपनीकडे पिक विम्याच्या अनेक तक्रारी केल्या होत्या त्या कंपनीने 80 रद्द केले आहेत व त्यापैकी फक्त 20 तक्रारी मंजूर केल्या आहेत त्यामुळे शेतकऱ्यांनी केलेल्या सर्व 100% प्राप्त तक्रारी मंजूर करून त्यांना पीक विमा मंजूर करण्यात यावा व वाटप करण्यात यावा. जिंतूर तालुक्यात सोयाबीन, कापूस, तूर, हळद, फळबाग ई. पिक मोठ्या प्रमाणात घेण्यात येते. चालू वर्षात पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे शेतकरी आडचणीत आलेला आहे. त्यामुळे जिंतूर तालुक्यात दुष्काळ जाहीर करावा व तसेच पिक विमा कंपनीने पंचनामे करून रक्कम अदा करण्यासाठी आदेशित करण्यात यावे तसेच शासनाकडून सुद्धा शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी. चालू वर्षात पीकविमा कंपनीने अजून शेतकऱ्यांना काहीच मदत केलेली नाही. यामध्ये शेतकऱ्यांना १००% आग्रीम मंजूर करण्यात यावा. महाराष्ट्रात तसेच परभणी जिल्ह्यातील जिंतूर व सेलू तालुक्यात शेतकऱ्यांचे कर्ज थकलेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना सरसगट कर्ज माफी देण्यात यावी. सन २०१८ मध्ये काही मंडळात अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान भरपाई शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आली होती.



# गाय गोठ्याच्या योजनेसाठी उडाली झुंबड

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात शेतकऱ्यांना जनावरांसाठी गोठा मंजूर करण्यासाठी सोयगाव पंचायत समिती कार्यालयाकडून अर्ज मागणी व मंजुरी देणे सुरू असल्याने अर्ज दाखल करण्यासाठी एकच झुंबड सुरू आहे. येथे कोणतीही शिस्त नसल्यामुळे विविध कागदपत्र दाखल करण्यासाठी शेतकरी कागदोपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी कार्यालयाला खेटे घालत आहेत. सध्या कोणत्या ना कोणत्या कारणाने शेतकरी अडचणीत आहेत, कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी अशा प्रसंगात शेतकऱ्यांना शेतीसाठी जोडधंदा म्हणून दुभत्या जनावरांचा मोठा आधार असतो, त्यात राज्य शासनाकडून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतून जनावरांचा गोठा मंजूर केला जातो. यामध्ये कुशल व अकुशल असा निधी असून सात हजार रुपये जॉबकार्डवरती देण्यात येतात असल्याची माहिती जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव छत्रपती संभाजीनगर यांनी बोलताना दिली. सध्या गोठ्याचे प्रस्ताव व मंजुरी देण्याचे काम सुरूरू आहे. येथील पंचायत समितीला मोठ्या प्रमाणात प्रस्ताव दाखल झाले आहेत तर काही शेतकरी तलाठी, कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी, पशु वैद्यकीय अधिकारी यांच्या स्वाक्षयऱ्या प्रस्तावावर असल्याने कागदोपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी फिरताना दिसत आहेत. प्रस्ताव दाखल केल्यानंतर छाननी केली जाते, त्यानंतर गटविकास अधिकारी मंजुरी देतात. सध्या सोयगाव,सिल्लोड विधानसभा मतदारसंघाला असलेले सोयगाव तालुक्यात ८३ गावे असे दोन विभाग करण्यात आले. दोन्ही विभागाचे मिळून जवळपास बरेच प्रस्ताव दाखल झाले आहेत. यातील काही प्रस्ताव मंजूर केले असले तरी पंचायत समितीच्या नरेगा विभागात कोणतीही शिस्त नसल्याने गोठ्याचे आलेले प्रस्ताव ६६ नियमानुसार मंजूरी करणे सुरू असून सध्या नरेगाचा निधी केंद्राकडून प्राप्त झाला नाही. सध्या सावळदबारा परिसरात काहीची वर्क ऑर्डर मिळाली आहे तर काही आजूक बाकी काही शेतकऱ्यांनी गाय गोठ्या बांधण्यासाठी सुरुवात करण्यात आली आहे.अशी माहिती जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी बोलताना सांगितले.

# देवाडा येथे श्री सिध्देश्वर शिवालय देवस्थानच्या कामाचे भुमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राजूरा तालुक्यातील देवाडा येथील श्री सिध्देश्वर मंदीरांचा समूह हा 12 व्या ते 13 व्या शतकातील आहे. पुरातन असलेल्या या मंदिराचे पुनरुज्जीवन आपल्या हातून व्हावे, ही भगवान महादेवाची इच्छा असेल. म्हणूनच सांस्कृतिक कार्य विभागाची जबाबदारी माझ्याकडे आली. या विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या पुरातत्व विभागाच्या माध्यमातून 800 वर्षापूर्वीच्या मंदिराचे पुनरुज्जीवन केल्याचा आपल्याला अतिशय आनंद आहे. विशेष म्हणजे या इश्वरीय कार्याचे आपण सर्वजण साक्षिदार आहोत, अशा भावना राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या.

राजुरा तालुक्यातील देवाडा येथील श्री. सिध्देश्वर शिवालय देवस्थानच्या मंदीर जतन-दुरुस्ती कामाचे भूमिपूजन करतांना ते बोलत होते. यावेळी वढा येथील श्री. संत स्वामी चैतन्य महाराज, माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, माजी आमदार ॲड संजय धोटे, माजी आमदार सुदर्शन निमकर,मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, सहायक संचालक मयूरेश खडसे, सिध्देश्वर शिवालय देवस्थानचे अध्यक्ष राधेश्याम कुर्मावार, गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदेव, तहसीलदार ओमप्रकाश गौड,देवाडाचे सरपंच शंकर मडावी, सोंडोचे सरपंच जयपाल आत्राम , दिलीप वांढरे , सतीश कोमरपल्लीवार, श्रीनिवास मंथनवार, विनोद नेरदुलवार आदी उपस्थित होते. पहिल्या टप्प्यात 14 कोटी 98 लक्ष रुपये खर्च करून मुख्य मंदीर आणि तीन ज्योतिर्लिंगच्या कामाचे भूमिपूजन झाले, अशी घोषणा करून सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, 800 वर्षापूर्वीच्या या मंदिराला एक इतिहास आहे. हे इश्वरीय काम माझ्या हातून घडावे, अशी भगवान महादेवाचीच इच्छा असेल. म्हणूनच पुरातत्व विभाग येत असलेल्या सांस्कृतिक कार्य विभागाचा मंत्री म्हणून सेवा करण्याची संधी मला प्राप्त झाली. मनात भाव ठेवून मंदिराचे पुनर्निर्माण करायचे असून 800 वर्षांपूर्वी मंदीर जसे होते, तसेच करण्याचा प्रयत्न आहे. पुढे मुनगंटीवार म्हणाले, इश्वराने ब्रम्हांड निर्माण केले. ब्रम्हांडात पृथ्वी आहे. पृथ्वीवर अनेक देश असून त्यात भारत हा एक देश आहे आणि भारतामध्ये अध्यात्म आहे, याचा आपल्याला सर्वांना अभिमान आहे. पहिल्या टप्प्यात आज मुख्य मंदीर आणि तीन ज्योतिर्लिंगच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले असले तरी दुस-या टप्प्यात महाशिवरात्रीपूर्वीच इतर कामे करण्यासाठी अतिरिक्त 15 कोटींची त्वरीत मान्यता देण्यात येईल. मंदिरापर्यंत जाण्यासाठी 1 कोटी 25 लक्ष रुपये रस्त्याकरीता मंजूर करण्यात येईल. तसेच रस्त्यावर सोलर लाईट व प्रवेशद्वारासाठी तीर्थक्षेत्र विकास निधीतून 1 कोटी रुपये देण्यात येणार आहे. या परिसरात 1001 बेलाची वृक्षे तर 501 रुद्राक्षाची वृक्षे वनविभागाने त्वरीत लावावीत, अशा सुचनाही पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिल्या. कानाकोप-यात भारताचे अध्यात्म पोहचले आहे. जगात सुख शोधण्यासाठी वणवण भटकावे लागते. आपल्या देशात मात्र मंदिरात गेल्यावर सुख आणि समाधान प्राप्त होते. त्यामुळे येथील मंदिराचे बांधकाम अतिशय दर्जेदार आणि गुणवत्तापूर्वक होण्यासाठी स्थानिक नागरिकांनी या कामावर लक्ष ठेवावे, असे आवाहन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. देवाडा येथील मंदीर समुह हा 12 व्या ते 13 व्या शतकातील असून येथे लहान-मोठे मंदिर आहेत. येथील मंदिराची रचना गर्भगृह, अंतराळ, मंडम अशी आहे. संपूर्ण मंदीर परिसरास प्रकार भिंतीचे अवशेष व त्यास दुमजली प्रवेशद्वार आहे. या मंदिर परिसराच्या पुनर्निर्माणाकरीता पहिल्या टप्प्यात 14 कोटी 98 लक्ष 56 हजार 971 रुपये मंजूर करण्यात आले आहे. यात प्राथमिक टप्प्यात जतन दुरस्ती करणे, या जतन दुरुस्तीच्या कामामध्ये जुन्या बांधकामाचे ग्राऊटींग करणे, पाया खोदकाम करणे, युसीआर बांधकाम करणे, घडीव दगडी पिल्लर, बीम, पेडेस्टल बसविणे, दगडी स्लॅब इंटरलॉकिंग पध्दतीने बसविणे, गर्भगृहातील शिखराचे बांधकाम करणे, बाह्य क्षेत्रात दगडी स्लॅबचे वॉटरप्रुफ करणे आदी कामे प्रस्तावित आहे.



उपविभाग प्रमुख अमोल निकाळजे यांच्या संपर्क कार्यालयमध्ये माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने समाजसेवक नितीन भाऊ वाकेकर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. गोपीनाथ जाधव, निलेश अहिरे, सतीश हिवाळे, अशोक चिमखडे, युवासेना सरचिटणीस देविदास रत्नपारखी, दिनेश तिवारी, सुरज निकाळजे यांची उपस्थिती होती.

# भव्य रोजगार मेळावा आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश कांबळे**

**उल्हासनगर :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा.श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन, किणीकर विकास प्रतिष्ठान सयुक्त विद्यमानाने भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब व कल्याण लोकसभेचे कार्यसम्राट खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या बाढदिवसानिमित्त डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन व किणीकर विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमानाने व आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या संयोजनाने युवकांसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ७०० व अधिक युवकांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घेतला. सदर मेळाव्यास सत्तरहून अधिक कंपन्यांनी भाग घेतला होता. यावेळी मा.नगराध्यक्ष सुनील चौधरी, उल्हासनगर महानगर प्रमुख राजेंद्र चौधरी, शिवसेना उपशराप्रमुख परशुराम पाटील, पुरुषोत्तम उगले महाराज गणेश कोतेकर, मा. नगरसेवक श्री. नंदकुमार भागवत, सुभाष साळुंखे युवा उद्योजक निखिल चौधरी, महिला आघाडीचा उपशहर संघटिका सौ. राखी जाधव, सौ. सुवर्णा साळुंके, सौ. सुषमा रसाळ, . अनिता लोटे, सौ. डॉ.विद्या सातपुते, युवासेना शहर अधिकारी निशांत पाटील, तसेच कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# सह्याद्री इंग्लिश स्कूलची गरुडझेप

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** इयत्ता 8 वी तील विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनातर्फे (संपुर्ण भारतात एकाच दिवशी) 24 डिसेंबर 2023 रोजी छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आलेल्या NMMS परीक्षेचां आज निकाल जाहीर झाला.यात यशाची परंपरा कायम राखत.... सह्याद्री इंग्लीश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बाजार सावंगीतील दोन विद्यार्थिनी कु ऋतुजा गणेश खंडागळे (येसगाव न.2 )कु.अक्षरा आबाराव खंडागळे( येसगाव न.2 ) या विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्या असून त्यांच्या या यशाबद्दल शाळेचे संस्थापक श्री एस एम पवार, मुख्याध्यापक श्री योगेश कुचे सर, श्री सतिश सोळंके सर,सोळंके मॅडम, कुचे मॅडम, भुषण सर,खंडागळे मॅडम, अधिकार मॅडम, बनकर मॅडम, नलावडे मॅडम, चव्हाण मॅडम भाग्यवंत ताई यांनी पुष्पगुच्छ देऊन ऋतुजा व अक्षरा चे अभिनंदन केले..... तसेच त्यांच्या या यशाबद्दल संपुर्ण बाजार सावंगी परिसरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# परीक्षेत अपयश; महिलेची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** स्पर्धा परीक्षेत सतत अपयश येत असल्याने नैराश्यातून ३० वर्षीय महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना अंजनगाव सुर्जी येथे उघडकीस आली आहे. श्रद्धा निखिल मोडक (३०) असे मृत महिलेचे नाव आहे. गेल्या काही वर्षांपासून श्रद्धा ही स्पर्धा परीक्षेची तयारी करत होती. अनेकदा परीक्षेत यशाने अगदी थोडक्यात हुलकावणी दिल्याने ती नैराश्यात होती. श्रद्धा ही पती निखिल मोडक (३४) याच्यासमवेत अंजनगाव सुर्जी येथील शिक्षक कॉलनीत अरुण दाभाडे यांच्या घरात भाड्याने राहत होती. मूळचे वणी येथील हे दाम्पत्य आहे. निखिल हा नेहमीप्रमाणे कामावर गेला होता. मंगळवारी सायंकाळी घरी परतल्यानंतर श्रद्धाने गळफास घेतल्याचे त्याला दिसून आले. तिला तातडीने खाली काढले. पण, तिचा मृत्यू झाला. निखिलने घटनाक्रम पोलीस ठाण्याला कळविला. घटनास्थळी दाखल होत पोलीस कर्मचाऱ्यांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. आत्महत्येपुर्वी श्रद्धा हिले पत्र लिहून ठेवले. त्यात पती, सासू, सासरे यांना दोष देत नाही. बँकिंग परीक्षेत वेळोवेळी अगदी थोडक्या गुणांनी क्रमांक हुकल्याचे नमूद केले आहे. तिने नैराश्येच्या गर्तेत जाऊन आत्महत्या केल्याचे यातून समोर आले. ठाणेदार अहिरे यांच्या मार्गदर्शनात संजय इंगळे व नितीन इंगळे तपास करीत आहेत.

# परतूर शहरात माता रमाई जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** शहरात माता रमाई आंबेडकर यांची १२६ बी जयंती मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. सकाळी दहा वाजता तहसील कार्यालयाच्या समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिम ला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांच्या हस्ते करण्यात आले. तर संध्याकाळी सहा वाजता माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेच्या भव्य मिरवणूकीची सुरूवात रेल्वे स्टेशन संविधान चौकातुन उपविभागीय पोलिस अधिकारी सुरेश बुधवंत, सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन पुंडके, उपनिरिक्षक विठ्ठल केंद्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. सजलेल्या रथामध्ये माता रमाई यांची प्रतिमा ठेवण्यात आली होती. डोल ताशांच्या गजरात व अर्जुन पाडेवार मित्र मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांनीच्या लेझीम पथकाचे विषय आकर्षण ठरले होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या घोषनेने पुर्ण शहर दणाणून सोडले. मिरवणूकी दरम्यान, युवा नेते नितीन जेथलीया, कपील आकात, प्रविण सातोनकर, शाम तेलगड, द.या काटे



यांची उपस्थिती होती. या मिरवणुकीत बौद्ध उपासक ऊपासिका यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती, मिरवणुकीचा समारोप आंबेडकर नगरात संजना पाडेवार यांच्या हस्ते रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. मिरवणुक शांततेत पार पाडण्यासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्निल पहाडे ऊप अध्यक्ष प्रशांत वाकळे, सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पांडेवार गुलाब दंवडे, राहुल नाटकर, प्रदिप साळवे, सनी गायकवाड, संतोष आखाडे, राम चंद्र पाणवले अँड राजेश पाईकराव, विकास वेडेकर, अविनाश पाडेवार, सिद्धार्थ बंड विलास पाडेवार, प्रविण बंड, दिपक भदर्ग, कुमार लांडगे, धम्माल खंडागळे, गुलाब दंवडे, अजय पाडेवार, विशाल पाडेवार, देविदास वाकळे, हार्शद पौळ, महेंद्र पाडेवार, भिमा जाधव, समाधान पाडेवार, दिपक कदम, तुषार पहाडे, जयराम वाकळे, गौतम घुगे, राजु पाडेवार, लिंबाजी पाडेवार, प्रकाश बंड, प्रकाश पाडेवार, लखण पहाडे, विकास पगारे, रुपेश पहाडे, यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती, मिरवणुकीचा समारोप आंबेडकर नगर येथे करण्यात आला. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पुंडगे यांनी पोलिस बंदोबस्त चोख ठेवला होता.

# राज्य उत्पादन शुल्क प्रशासकीय इमारत कामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सार्वजनिक बांधकाम उपविभाग धुळे अर्थसंकल्पीय तरतुदी अंतर्गत अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क धुळे या प्रशासकीय इमारतीचे सुमारे सात करोड रुपये कामाच्या शुभारंभ आ.फारुख शाह यांच्या हस्ते आज करण्यात आले. आ.फारुख शाह यांच्या धुळे शहरातील विकास या हेतूने शहराच्या विकासासाठी मूलभूत सुविधांसाठी करोडो रुपयांच्या निधी आणून विकासकरण्यात आला तसेच धुळे शहर शहरात अनेक प्रशासकीय इमारती या भाड्याच्या जागेवर होते तसेच त्यांना पुरेशी जागा नसल्यामुळे प्रशासकीय कामांमध्ये अनेक अडचणी निर्माण होत होत्या या समस्या बघून आ.फारुख शाह यांनी धुळे शहरातील प्रशासकीय इमारत साठी आरटीओ कार्यालय, आदिवासी प्रकल्प कार्यालय ,हिरे मेडिकल कॉलेजच्या इमारती ,औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची इमारत व प्रस्तावित प्रशासकीय इमारतीसाठी करोडो रुपयांच्या निधी मंजूर करून आणलेला आहे त्याच्यात एक भाग म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे अर्थसंकल्प अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांचेकार्यालयासाठीसाठी सात कोटी रुपये मंजूर करण्यात आलेले आहे. त्याचा शुभारंभ आ.फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आले.आजपर्यंत धुळे शहराच्या इतिहासात आ.फारुख शाह यांनी प्रशासकीय इमारतीसाठी जो निधी आणलेला आहे तो कोणत्याच आमदारांनी आणलेला नसून यासाठी धुळे शहरातील नागरिकांनी आ.फारुख शाह यांचे आभार मानलेले आहे लवकरच धुळे शहरात एक भव्य अशी सर्व विभागासाठी प्रशासकीय इमारत प्रस्तावित असून त्याचे सुद्धा बांधकाम लवकरच सुरू होणार आहे या कार्यक्रमात आ.शाह यांचेसोबत रवींद्र पाटील कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,राहुल पाटील कनिष्ठ अभियंता,भिखन शाह,आसिफ शाह,कैलास गर्दे,माजी नगरसेवक नासिर पठाण,माजी नगरसेवक आमिर पठाण,डॉ. दीपश्री नाईक,प्यारेलाल पिंजारी,इकबाल शाह,हारूण खाटीक,डॉ. बापुराव पवार, इंजी. अफसर शाह,शादाब खाटीक,शाहरुख शाह,समीर शाह आदी उपस्थित होते.



# अजित पवारांचा गुंडांना थेट इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कोथरूडच्या सुतारदरा परिसरात कुख्यात गुंड शरद मोहोळवर ५ जानेवारी २०२४ रोजी दुपारच्या सुमारास चार जणांनी गोळ्या झाडून खून केल्याची घटना घडल्यानंतर शहरात एकच खळबळ उडाली होती. या घटनेतील आरोपींना काही तासांत जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले होते. मात्र आगामी काळात शहरात टोळी युद्ध होऊ नये या पार्श्वभूमीवर नवनियुक्त पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार शहरातील जवळपास २६७ हून अधिक गुंडाच्या टोळी प्रमुखांना चार दिवसांपूर्वी पोलीस आयुक्त कार्यालयात बोलावून आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. यामध्ये गुंड गजानन मारणे, निलेश घायवळ हे देखील उपस्थित होते. तर या गुंड निलेश घायवळ याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत मुंबईत फोटो काढला होता आणि मंत्रालय परिसरात रिल्स देखील तयार केली होती. हे व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला होते. यावरून विरोधकानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर एकच टीका करण्यास सुरुवात केली होती. शहरात कोणत्याही गुन्हेगारीच्या घटनेला प्रोत्साहन देणे किंवा सहभागी झाल्यास, तुमच्यावर थेट कारवाई केली जाईल. तसेच सोशल मीडियावर कोणत्याही प्रकारचे रिल्स किंवा मेसेज करु नयेत, हे सर्वांनी लक्षात ठेवावे.

# कितीही त्रास द्या, आमचा लढा सुरुच राहील

## बाबाराव पाटील खडसे : निवडणूक आयोगाच्या निकालाविरोधात निषेध आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

वसंत पाटील
वाशिम : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या विरोधात निवडणूक आयोगाने दिलेला निकाल पक्षपाती असल्याचा आरोप करत आज दि.९ रोजी शरद पवार गटाने निषेध आंदोलन केले आहे. सत्तेचा दुरुपयोग करून कितीही त्रास दिला तरी सत्यासाठी आमचा लढा अविरत सुरुच राहील असे प्रतिपादन राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी यावेळी केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांच्या नेतृत्वात आज निवडणूक आयोगाच्या निकालाविरोधात प्रचंड घोषणाबाजी करत निषेध आंदोलन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने ते बोलत होते. पुढे बोलताना खडसे पाटील म्हणाले की, पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांनी गेली २५ वर्षे ज्या पक्षाला उभे केले. त्याचे संगोपन करून मोठे केले. आज त्याच पक्षाचे नाव व चिन्ह हिरावून घेण्यात आले आहे. देशात सत्ताधारी दडपशाहीचा अवलंब करीत असून, निवडणूक आयोगाने पक्षपाती निकाल दिला हे सत्ताधाऱ्यांच्या हुकुमशाहीचे ज्वलंत उदाहरण आहे. त्याचा निषेध म्हणुन संपुर्ण जिल्ह्यात आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी म्हटले आहे. यावेळी जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील, जिल्हाउपाध्यक्ष कैलास खानझोडे, तालुकाध्यक्ष गजानन सरनाईक, रवि पाटील, माधवराव शेवाळे, नितीन सरकटे, विष्णु काळे, भागवत बोडखे, संदीप पाचरणे, राजु जाधव, विनोद पाटील खडसे, पुरुषोत्तम नरवाडे, कुंडलिक खानझोडे, गजानन तिरके, प्रकाश तायडे, विठ्ठल जाधव, उमेश गाडे, मनोज खडसे, कुंडलिक लोणकर, दिपक नरवाडे, फकिरा हाडे आदींसह शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.






## हक्काची जमीन बळकावली म्हणून न्याय मिळावा; पीडित कुटुंबाची पत्रकार परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राष्ट्रीय महामार्ग क्र.३ चौपदरीकरणात भुसंपादन करताना रडीचा डाव खेळला गेला. भुसंपादनाच्या प्रक्रियेत बारा प्लॉट हडपले गेले. हक्काची मालमत्ता हडपली जावून गेल्या सहा वर्षांपासून न्याय मिळत नसल्याने भरपत्रकार परिषदेत मंगलाबाई चित्ते या महिलेला रडू कोसळले, माध्यमांनीच न्याय मिळवून द्यावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पत्रकार परिषदेत भुमीका मांडताना श्रीमती मंगलाबाई चित्ते, संदीप जोशी, निवृत्ती गवळी म्हणाले की, मुंबई-आग्रा महामार्ग क्र.३ चौपदरीकरणात रितसर संपादन न करता बाधीत झालेल्या आर्वी ता.धुळे येथील सिटीसर्व्हे नंबर ८३० ते ८२१ असे एकून १२ रहिवासी प्लॉट कुठलीही पूर्व सुचना न देता संपादीत करण्यात आले. कुठलीही पूर्व सुचना न देता संपादीत केलेल्या प्लॉटचा मोबदला मिळाला नाही. मोजणी करताना आमच्या जागा महामार्गाच्या कामात वापरण्यात आल्याचे निदर्शनास आले. आर्वी गावठाण भुमापन क्रमांक ३ सन १९८७ च्या नकाशानुसार आमच्या मालमत्ता या सुरक्षीत आणि व्यवस्थीत होत्या.त्यानंतर १४ मार्च २०२२ रोजी भुमीअभिलेख विभागामार्फत परिरक्षक भुमापक बोरकुंड यांच्यामार्फत मोजणी केली असता आमच्या मालमत्ता नॅशनल हायवे ३ च्या चौपदरीकरणात बाधीत झाल्याच्या लक्षात आले. सन २००६ मध्ये भुसंपादन विभाग आणि एनएचएआय यांनी जमिनीची मोजणी करुन संबंधीत प्लॉट धारकांना नोटीस न देता आमच्या मालमत्तांचा वापर केला. उपअधिक्षक भुमी अभिलेख यांच्याकडून संबंधीत जमिन मोजणी केली असता त्यात देखील आमच्या मालमत्ता गावाजवळील उड्डाणपुलाखाली बाधीत झालेल्या दिसत आहेत. तत्कालीन उपजिल्हाधिकारी वेळ काढू धोरण अवलंबले त्यामुळे दि.२८ ऑगस्ट २०२३ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना त्याबाबत तक्रार केली. नकाशा तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करणेबाबत आम्ही स्वतः गेलो असता उपजिल्हधिकाऱ्यांनी काही ऐकून न घेता हिन वागणुक दिली. गावातील काही स्वयंघोषीत पुढारी तत्कालीन पदाधिकारी यांचा हस्तक्षेप आहे का? गावठाणच्या नावाने कोणी भरपाईचे पैसे लाटले का याबाबत चौकशी करुन आम्हाला आमचे प्लॉट मिळवून द्यावे अन्यथा कुटुंबासह आत्मदहन करुन असा इशारा पत्रकार परिषदेतून दिला.

## गिरिजापात्रातून हायवा, ट्रॅक्टरच्या साह्याने लाखो ब्रास वाळूचा अवैध उपसा सुरू

### संबंधित अधिकाऱ्यांचा जाणून बुजून कानाडोळा

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**
**फुलंब्री :** भालगाव, कविटखेडा, वडोद बाजार, वडोद खुर्दवाडी, शेवता, पेंडगाव, पाडोळी, गणपती बोरगाव, लिमखेडा, गिरजा नदीपात्रामध्ये रात्रीच्या वेळी वाळू माफियांचा पोळा फुटत असून हायवा, ट्रॅक्टरच्या साह्याने वाळू माफिया गिरिजा नदीपात्रामध्ये महसूल विभागाचे लाखो रुपयांची वाळू चोरी होत आहे. संबंधित तहसीलदार यांनी नेमलेले पथक अपयशी ठरत असून अवैध वाळू उपसा करणाऱ्या हायवा, ट्रॅक्टर मालकांवर कुठलीही कारवाई करत नाही. पथक नेमलेल्या व तहसीलदार, अधिकाऱ्यांना फोन केलास फोन घेत नाहीत. नेमलेले पथक उडवडीचे उत्तर देतात.
फुलंब्री तालुक्यातील महसूल व पोलीस प्रशासन वडोद बाजार परिसरामध्ये गिरजा नदीपात्रामध्ये शासनाचे लाखो रुपयांची वाळू चोरी जात असून शासनाचे काही अधिकारी व वाळू माफिया यांचे साटेलोटे आहे की काय ? असा प्रश्न नागरिकांमध्ये पडला आहे. या परिसरामधील शेतकऱ्यांचे विहिरीची पाण्याची पातळी वाळू उपसा केल्यामुळे खोल जात असून भविष्य काळामध्ये पिण्याचे पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता होत आहे. शेतकऱ्यांच्या विहिरीचे पाणी कमी होत आहे. जिल्हाधिकारी, ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी दखल घालून कारवाईची मागणी होत आहे. वडोद बाजार पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये रात्रीच्या वेळी ठीक ठिकाणी वाळू माफिया शेकोटी करून लोकेशनसाठी बसलेले राहतात. हे वडोद बाजार पोलीस स्टेशनच्या लक्षात का येत नाही? त्यांची चौकशी का करत नाही असा प्रश्न शेतकऱ्यांना पडत आहे.







## शालेय समितीच्या अध्यक्षपदी किशोर मालोदे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा लामनगाव येथे द्वितीय सत्रातील पालक मेळाव्यात भौतिक व शैक्षणिक अडचणी वर चर्चा करून नूतन शालेय व्यवस्थापण समिती खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. शाळेचे मुख्याध्यापक जाधव यांनी प्रास्ताविक करून शासकीय परिपत्रकानुसार वर्गवार आरक्षण करून सदस्यांची निवड करण्यात आली,किशोर मालोदे-अध्यक्ष सौ सोनिया गायकवाड-उपाध्यक्ष सदस्य-राजू राठोड, अरुण रगडे,सुरेश मालोदे, कचरू शिंदे, रमेश मालोदे, ज्ञानेश्वर काळे, गोरख काळे, बाळू गायकवाड, एकनाथ मालोदे, विजय भंडारी, कल्पना मालोदे, वंदना मालोदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नव्यानेच रुजू झालेले शिक्षक गोपाल दुतोंडे सर यांचे स्वागत केले. या प्रसंगी पोलीस पाटील शरद मालोदे, तंटामुक्ती अध्यक्ष कारभारी तात्या मालोदे, नवनाथ मालोदे, अशोक मालोदे, विष्णू मालोदे, अशोक पवार, गोरख मालोदे, नामदेव मालोदे, दिलीप राठोड, गणेश मोटे, किरण मालोदे, सुनील मालोदे, कैलास मालोदे, मु अ बी. डी. जाधव, दत्ता खाडे, विजय भंडारी, गोपाल दुतोंडे, मनोज साळुंके, मुस्तफा शेख,संतोष बोबडे पालक व गावकरी उपस्थित होते.

9130174444
हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# भोकर लगत अपघातात ५ जण ठार; एक गंभीर, ४ जखमी

## भोकर-उमरी रस्त्यावरील घटना : मयतात एकाच कुटुंबातील व्यक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भोकरहून ऊमरी मार्गे गुरुवारी ता.(आठ) मारोती सूझुकी कंपणीची(ब्रेझा गाडीने) मध्यरात्री तेलगंणाकडे जात असताना मोघाळी - हळदा गावालगत वाहनाचे समोरील टायर फुटून पुलावरून खाली पडल्याने गाडीतील पाच जणाचा मृत्यू झाला तर एक गंभीर असून चार जखमी झाले आहेत.मयतात एकाच कुटुंबातील व्यक्तींचा समावेश असल्याने रेणापुर गावावर शोककळा पसरली आहे. पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भोकरला नातेवाईकांच्या घरी कार्यक्रम आटोपून






तेलंगणाकडे वाहनाने जात असतांना वाहनाचे समोरचे चाक फुटल्याने चालकाचा वाहनावरील ताबा सुटला व पुलावरुन वाहन खाली कोसळले. वाहनातील काही जणांनी आरडाओरड केल्याने जवळच्या शेतात असलेले शेतकरी मदतीसाठी धावून आले. घटनास्थळी पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मारकड, सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना राठोड, दिलीप जाधव, संभाजी देवकांबळे,जमादार रवि मुधोळे, परमेश्वर कळणे, लहु राठोड, मंगेश क्षिरसागर यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते जुनेद पटेल, सुलेमान शेख, शाहरुख खान तात्काळ घटनास्थळी पोहचले आणि वाहनात अडकलेल्या बाहेर काढले असता यातील सविता श्याम भालेराव ( वय २५), प्रिती परमेश्वर भालेराव ( वय ८) दोघी रा. रेणापूर ता. भोकर व सुशिल मारोती गायकवाड ( वय ९) रा. रामखडक ता. उमरी या तिघांचा जागीच मृत्यू झाला तर गंभीर जखमी झालेल्या रेखाबाई परमेश्वर भालेराव ( वय ३०), अंजनाबाई ज्ञानेश्वर भालेराव ( वय २८), श्याम तुकाराम भालेराव ( वय ३५) तिघे ही रा. रेणापूर ता. भोकर यांना उपचारासाठी नांदेड येथे रवाना करण्यात आले पण रुग्णालयात पोहोचण्यापूर्वी दोघींचा रस्त्यातच मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी घोषित केले. गंभीर जखमी असलेला श्याम तुकाराम भालेराव यांच्यावर नांदेड येथे उपचार सुरु आहेत. येथील ग्रामीण रुग्णालयात दत्ता ज्ञानेश्वर भालेराव ( वय ९), प्रितेश परमेश्वर भालेराव ( वय ८), सोहम ज्ञानेश्वर भालेराव ( वय ७), ज्ञानेश्वर तुकाराम भालेराव ( वय २८) सर्वजण रा. रेणापूर ता. भोकर यांच्यावर उपचार सुरू आहेत.

मयत व जखमी सर्वजण हे एकाच कुटुंबातील असून मयत तिघी या सख्ख्या जावा आहेत. सदरील अपघातात एकाच गावातील ५ जणांचा मृत्यू झाल्याने रेणापूर गावावर शोककळा पसरली आहे.

# तहसील कार्यालयातील पुरवठा विभाग रामभरोसे

## लेटलतीफ कर्मचाऱ्यांमुळे नागरिक वैतागले; असून अडचण नसून खोळंबा

आधुनिक केसरी न्यूज

**चाँदखाँ पठाण**

**खुलताबाद :** येथील तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या नियमित लेटलतीपणामुळे नागरिक वैतागले असून पुरवठा विभाग रामभरोसे असल्याचे चित्र दिसत आहे. सेवा हमी कायद्याचा उलंघन होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, खुलताबाद तालुक्यातील तहसील कार्यालयात पुरवठा विभागातील कर्मचारी हे नियमित उशिरा येतात. बारा एक वाजे दरम्यान येतात आणि चार वाजताच घराकडे जात असल्याने नागरिकांना सेवा सुविधा मिळण्यास अडचणी निर्माण होत आहेत. या लेटलतीफ कर्मचाऱ्यांच्या सवयीमुळे पुरवठा विभागातील कामे खोळंबली असून यात नावे ONLINE करणे, नवीन शिधापत्रिका, विभक्त शिधापत्रिका, तसेच नाव कमी करणे, नाव समाविष्ट करणे आदी सेवा सुविधा देण्यात येतात मात्र येथील कर्मचारी हे वेळेवर कार्यालयात येत नसल्याने नेहमी या ठिकाणी येऊन मनस्ताप होत असल्याचे चित्र नागरिक व्यक्त करतात.



तहसील कार्यालयातील पुरवठा विभाग रामभरोसे आहे, येथील सर्वच



कर्मचारी वेळेवर येत नाहीत, कर्मचाऱ्यांवर प्रशासनाचा वचक राहिलेला नाही. लेट लतिफ कर्मचाऱ्यांमुळे नागरिकांचे कामे खोळंबली आहेत. पुरवठा विभागात शेकडो अर्ज कामाच्या प्रतीक्षेत आहेत. कर्मचाऱ्यांना नागरिकांच्या समस्या बाबत सोयरसुतक दिसत नाही. तसेच कामाबद्दल ही अनास्था दिसून येते. संबंधित कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करावी.

**सतीश देवेंद्र लोखंडे, प्रदेश युवा संघटनमंत्री, आम आदमी पार्टी महाराष्ट्र.**

**मला गेल्या सहा महिन्यांपासून शिधा (रेशन) मिळत**



**नाही त्यासाठी मी दोन तीन दिवसांपासून येथे पुरवठा विभागात येत आहे. माझे वय ७८ आहे उन वाढत आहे. आजही सकाळी लवकर आलो बारा वाजले तरी देखील येथे कोणीच साहेब आलेले नाही.**

**नामदेव शेषराव होळकर, ममनापुर**

# भाजपच्या युवा मोर्चा अध्यक्षपदी ऋषिकेश धायगुडे यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** सामाजिक बांधिलकी जपत जनतेच्या सेवेसाठी सतत कार्यरत असणारे अहिरे



ता.खंडाळा येथील युवा नेते ऋषिकेश धायगुडे पाटील यांची खंडाळा तालुका भाजपच्या युवा मोर्चा अध्यक्ष पदी निवड करण्यात आलेली आहे.सातारा जिल्हा भाजपा कार्यालयातून ही निवड घोषित करण्यात आलेली आहे.या निवडीबद्दल ऋषिकेश धायगुडे पाटील यांचे विशेष अभिनंदन होऊ लागले आहे.खासदार उदयनराजे भोसले, खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार जयकुमार गोरे,आमदार महेश शिंदे, माजी आमदार मदन भोसले, जिल्हाध्यक्ष धैर्यशील माने, अनिरुद्ध गाढवे यांच्या सह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते आदींनी ऋषिकेश धायगुडे पाटील यांचे अभिनंदन केले. ऋषिकेश धायगुडे पाटील यांनी गेल्याच वर्षी भाजप मध्ये प्रवेश केला होता. गेली एक वर्ष पक्षाच्या माध्यमातून विविध कामे करण्याचा ते प्रयत्न करत आलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यपध्दतीबद्दल सुद्धा लोकांमध्ये एक वेगळा विश्वास निर्माण झालेला आहे. शिवाय भारतीय जनता पार्टी मध्ये सुद्धा त्यांनी एक चांगला जम बसविलेला आहे. प्रामाणिकपणे कार्य करत असलेल्या ऋषिकेश धायगुडे पाटील यांच्या कार्याची जी पक्षाने दखल घेतली आहे, त्याबद्दल जनता सुद्धा समाधानी आहे. धायगुडे या युवा नेतृत्वाकडे पक्षीय जबाबदारी दिल्या बद्दल खंडाळा तालुक्यातील जनतेने, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष समाधान व्यक्त केलेले आहे. या निवडी बद्दल स्वतः ऋषिकेश धायगुडे पाटील यांनी स्वतःच्या भावना व्यक्त करताना म्हटलेले आहे की,तालुक्याचे पद सांभाळणे सोपे नसते.पक्षाने या पदास मला पात्र समजून खंडाळा तालुक्याची जी जबाबदारी माझ्यावर दिली.याबद्दल मी पक्षाचे खूप खूप आभार व्यक्त करतो.पक्षाचे कार्य व पक्षाच्या माध्यमातून जनतेची कामे जबाबदारी पूर्वक व प्रामाणिकपणे करणार आहे.असे सुद्धा ऋषिकेश धायगुडे पाटील यांनी म्हटले.

# कोल्हापूरच्या सुपुत्राची युनायटेड किंग्डम सरकारच्या विशेष सल्लागारपदी नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** अर्जुनवाड गावचा सुपुत्र, युवा कृषी धोरणकर्ता व संशोधक विनायक हेगाणा याची युनायटेड किंग्डम सरकारच्या आरोग्य व ग्रामीण विकास मंत्रालयाच्या विशेष सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या जबाबदारीवर काम करणारे विनायक हेगाणा हे देशातील पहिले कृषी पदवीधर संशोधक ठरले आहेत. स्वान्सी विद्यापीठाच्या संशोधक व संचालक डॉ. इमा फारसन या सल्लागार गटाचे नेतृत्व करत आहेत. या सल्लागार मंडळाच्या माध्यमातून विनायक हे विशेष प्रतिनिधी म्हणूनही समन्वय करतील. काही महिन्यांपूर्वीच हेगाणा यांना ब्रिटिश सरकारच्या 'चेव्हनिग ग्लोबल लीडर' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. तसेच 'लोकसत्ता तेजांकित' हा पुरस्कार देखील त्यांना मिळाला आहे. जागतिक नामांकित विद्यापीठामध्ये संशोधन विषयक अभ्यास करत असताना हेगाणा यांना युनायटेड किंग्डम मधील शेतकरी व ग्रामीण भागातील अभ्यासातून विविध प्रकारची माहिती मिळाली. हेगाणा यांच्या ग्रामीण मानसिक आरोग्य विषयक संशोधन कामाची दखल घेऊन युनायटेड किंग्डम मधील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी धोरण निर्मिती व सल्ला या महत्त्वपूर्ण कामाची जबाबदारी त्यांना देण्यात आली आहे. हेगाणा यांचे 'शेतकरी आत्महत्या शोध आणि बोध' हे पुस्तक शिवारात काम करणारा कार्यकर्ता ते लेखक या भूमिकेतून प्रकाशित झाले आहे. हे पुस्तक संशोधक, अभ्यासक, कार्यकर्ता, शेतकरी, युवापिढी, प्रशासकीय अधिकारी यांना मार्गदर्शक ठरत आहे. या पुस्तकात शेतकरी आत्महत्येचा फक्त उपापोह न करता, शाश्वत उपाययोजनेतून कृती कार्यक्रम सुचवलेला आहे. शेतकरी आत्महत्या या प्रश्नाकडे बघण्याचा सर्वसमावेशकपणे दृष्टिकोन पुस्तकात मांडण्यात आला आहे.

# जागतिक कर्करोग दिन आरोग्य केंद्र कनकशिळ येथे साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** कनकशीळ येथील जागतिक कर्करोग दिन हा कर्करोगाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्याचे प्रतिबंध,शोध आणि उपचारांना प्रोत्साहन देण्यासाठी 4 फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. त्याचेच औचित्य साधुन खुलताबाद तालुक्यातील आरोग्य वर्धिनीकेंद्र कनकशीळ येथे कर्करोग या आजराविषयी जनजागृती करण्यासाठी विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, त्यानिमित्ताने समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. रमेश शेळके यांनी विविध प्रकारचे कर्करोग आणि त्याची लक्षणे या विषयावर नागरिकांना मार्गदर्शन केले तसेच सुरवातीच्या काळातच कर्करोगाचे निदान झाल्यास योग्य उपचाराने कर्करोग निश्चित बरा होतो असे त्यांनी सांगितले.कर्करोग विषयी नागरिकांच्या मनातील विविध प्रश्नांचे शंका निरसन करून



त्याबाबतीत असलेले गैरसमज दुर करण्यात आले. कर्करोग उपचार या विषयी शासकीय रुग्णालयात कोठे आणि कशाप्रकारे मोफत उपचार दिले जातात याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी शिबिरात सहभागी एकूण 84 नागरिकांची संपुर्ण आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी अधिष्ठान फाउंडेशन या एनजीओद्वारे कर्करोगाविषयी जनजागृती करणाऱ्या महितीपत्रकांचे मोफत वाटप करण्यात आले. शिबिरासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ निलोफर अंज्जूम, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ रमेश शेळके,सरपंच संदीप निकम, आरोग्य सहायक विजय जाधव, आरोग्य सेवक अनिल बनकर,ज्योती चिमणे, आशा सुनीता निकम,हिरा दांडगे, अरुना जाधव, अनिता मुरकुंडे यांनी परिश्रम घेतले.

# मोहजाबंदी येथील येथील गावठी दारूबंदीसाठी महिला आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील मोहजाबंदी हे गाव जिल्ह्याच्या सिमेवर असून चारही बाजुने घणदाट जंगल आहे. त्यामुळे गावठी हात भट्टयांद्वारे दारूचे गुत्ते गावा मध्ये मोठ्या प्रमाणात आसुन जेष्ठासह,तरूण दारूच्या व्यसनाने बरबाद होत आसुन अनेक कुटुंबातील सदस्यांना दारूच्या व्यसनाने गाव सोडणे भाग पाडल्याने महिलांच्या पुढाकारात ग्रामपंचायत दारूबंदीचा ठराव पारीत करीत गावा मध्ये दारूबंदी करण्यासाठी महिलांनी एल्गार पुकारला आहे. मोहजाबंदी



हे गाव घणदाट जंगला मध्ये वसलेले आहे. या गावातील सुमारे शंभर पेक्षा जास्त युवक देशसेवेसह, विविध शासकीय नोकरीवर आहेत. परंतु जेव्हा केव्हा गावामध्ये येतात तेव्हा गावामध्ये गावठी हातभट्टीच्या दारूचा महापुर दिसुन येतो. अनेकदा काही सुज्ञ नागरिकांनी दारूबंदी साठी पुढाकार घेतला तेव्हा काही समाज कंटकानी तक्रार कर्त्यांच्या शेतातील उभ्या पिकाचे नुकसान किंवा सोयाबिन, गहु, तुरीच्या सुड्या जाळण्या धमक्याने तक्रारदार शांत राहात होते.परंतु गावठी हातभट्याची दारू विक्रेत्यांनी एक प्रकारे कळस गाठत गावामध्ये खुलेआम दारू विक्री करणे, दादागिरी करणे, अल्पवयीन मुलांना जाणीवपूर्वक दारूच्या आहारी घालणे आशा नानाविध शकली लढवित गावातील वातावरण दुषीत करून गावातील बारा भानगडींना खतपाणी घालत आसल्याने गावातील त्रस्त महिलांनी गावठी दारू बंदी विरोधात एल्गार पुकारात, ग्रामपंचायत चा दारूबंदीचा ठराव घेत मोठ्या प्रमाणात स्वाक्ष-या घेत दारूबंदीची तक्रार रिसोड पोलिस स्टेशन, जिल्हा पोलिस अधीक्षक, दारूबंदी विभाग यांना दिले आहे. सदर निवेदनावर गावातील बहुतांश महिलांच्या स्वाक्ष-या आहेत.

# भूसंपादन : जिल्हाधिकारी, भूसंपादन अधिकाऱ्यांना नोटीस

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** तालुक्यातील यनोली, वाघी( धा) व हनवतखेडा आदी गावातील शेतजमीनी रोजगार हमी योजने अंतर्गत पाझर तलावांसाठी संपादित करण्यात आल्या होत्या. मात्र मागील अनेक वर्षांपासून जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळाला नाही, त्यातच जिल्हाधिकारी व भूसंपादन अधिकारी मागील दोन वर्षांपासून वेगवेगळी कारणे देऊन शेतकऱ्यांची अडवणूक करत आहेत.त्यामुळे यनोली,वाघी, हनवतखेडा गावातील शेतकऱ्यांनी उच्च न्यायालयात धाव घेऊन याचिका दाखल केली होती. यावेळी माननीय उच्च न्यायालयाने सुनावणी अंती दिनांक 31 जानेवारी रोजी जिल्हाधिकारी, भूसंपादन अधिकारी व इतर अधिकाऱ्यांना नोटीस जारी केल्या आहेत. जिंतूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमीनी लघुसिंचन जलसंधारण विभाग जालना कार्यालयाने जुन्या रोजगार हमी योजने अंतर्गत पाझर तलावासाठी सण 2007-2008 मध्ये संपादित करून, तडजोड पत्रावर सह्या घेऊन जमिनी ताब्यात घेण्यात आल्या होत्या. सदरील तडजोड पत्रामध्ये स्पष्ट नमूद करण्यात आले होते की,जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेतल्यापासून भूसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार जमिनीचा ठरलेल्या किंमतीवर दरसाल दर सेकडा 6 टक्के दराने भाडे देण्यात येईल व भाडे भरपाईची अंतिम रक्कम ठरवे पर्यंत 4 टक्के रक्कम तात्पुरते भाडे देण्यात येईल. मात्र 2007 - 2008 जमिनी ताब्यात घेऊन कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्यात आली नाही. जिल्हाधिकारी यांनी मागील दोन वर्षांपासून जवळपास चार वेळेस स्थळ पाहणी करण्याचे आदेश दिले आहेत यावेळी पंचा समक्ष स्थळ पाहणी करण्यात आलेली आहे. तरीही अद्याप पर्यंत अंतिम निवाडा पारीत करून शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला दिलेला नाही तसेच नियमानुसार निवाडा पास होण्याच्या अगोदर दिले जाणारे भूभाडे सुद्धा अद्याप पर्यंत देण्यात आलेले नाही याबाबत शेतकऱ्यांनी वेळोवेळी भूसंपादन अधिकारी,जिल्हाधिकाऱ्यांना भूभाडे व जमिनीचा मोबदला मिळण्या संदर्भात वेळोवेळी अर्ज लिहून विनंती केली होती,परंतु त्यांनी सादर केलेल्या अर्जाची भूसंपादन अधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांनी कोणतीच दखल घेतली नाही म्हणून उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंड पिठात अँड युवराज बारहाते यांच्या मार्फत शेतकऱ्यांनी रिट याचिका दाखल केली होती. सदरील याचिकेवर सुनावणी अंती प्रतिवादीना नोटीस जारी करण्याचे आदेश दिले असून दिनांक. 4 मार्च रोजी पुढील सुनावणी ठेवण्यात आली आहे. या याचिकेत एक महिण्यात भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करून मोबदला द्या,तसेच ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामूळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे त्याची भरपाई संबंधीतांकडून वसूल करण्यात यावी व दोषी अधिकारी व कर्मचारी यांची विभागीय चौकशी करून कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे या प्रकरणी अँड युवराज बारहाते शेतकऱ्यांच्या वतीने बाजू मांडत आहेत.



**संपादीत जमीन कमी केल्या प्रकरणीही उच्च न्यायालयाची नोटीस :** जिंतूर तालुक्यातील सावरगाव व सेलू तालुक्यातील राव्हा येथील शेतकऱ्याची पाझर तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना पूर्व कल्पना न देता परस्पर खोदकाम झालेल्या जमिनीवर पाणी साठा होत नसल्याचे कारण देऊन क्षेत्रफळ कमी केले होते यामुळे खोदकाम झालेल्या जमिनीत कोतेही पिके घेता येत नाहीत म्हणून आर्थिक नुकसान झाले होते यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी अँड युवराज बारहाते यांच्या मार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती या प्रकरणीही न्यायालयाने नोटीस जारी केली असून एक महिन्यात उत्तर दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत .

**या शेतकऱ्यांच्या जमिनी केल्या कमी :** राव्हा पाझर तलावातील शेतकरी भोजा शंकर देवकते 0 .16 आर, सुशिलाबाई त्रंबकराव 0 .11 आर व रामा गंगाधर 0 .26 आर जमीन कमी करण्यात आली आहे तर सावरगाव येथील गंगाधर महादेव लिखे यांच्या कुटुंबातील 50 आर जमीन कमी करण्यात आली आहे .

माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार एखाद्या जमिनीचे भूसंपादन करून ताबा घेतला गेला असेल तर सदरील जमिनीची भूसंपादन प्रक्रिया रद्द करता येत नाही सदरील प्रकरणात 15 वर्षांपूर्वी ताबा घेऊन काम पूर्ण केले आहे .
**अॅड . युवराज बारहाते उच्च न्यायालय खंडपीठ संभाजीनगर**

# गडचिरोली जिल्ह्याला मिळणार ५५ बसेस; मंत्री धर्मराव आत्राम यांच्या प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**भास्कर फरकडे**

**गडचिरोली :** जिल्ह्यातील एसटी महामंडळात बसेसची कमतरता बघता याठिकाणी नवीन बसेस उपलब्ध करून देण्यासाठी मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी मागील काही महिन्यांपासून पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून गडचिरोली जिल्ह्यासाठी नवीन ५५ बसेस मिळणार आहेत. मानव विकास कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील सर्वच मुलींना इयत्ता बारावीपर्यंत शिक्षण घेणे शक्य व्हावे, याकरिता गाव ते शाळा दरम्यान वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून गडचिरोली जिल्ह्याकरिता ५५ अतिरिक्त बसेस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मुलींना शिक्षण घेणे अधिक सोयीस्कर होणार असल्याचा विश्वास राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी व्यक्त केले.

मानव विकास योजनेंतर्गत राज्यभरात निवडलेल्या २३ अतिमागास जिल्ह्यांतील १२५ तालुक्यांमध्ये मानव विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक तालुक्यासाठी ५ बसेस यानुसार राज्यातील १२५ तालुक्यांसाठी ६२५ बसेस खरेदी करण्यात आल्या आहेत. राज्यातील आदिवासीबहुल व विकासाच्या प्रवाहात मागे असलेल्या गडचिरोली जिल्ह्याकरिता उपलब्ध बसेस, प्रत्यक्ष सुरू



असलेल्या बसेसची संख्या, बसेसचे आयुर्मान १०वर्ष किंवा ६.५० लक्ष किमी असल्याने गडचिरोली जिल्ह्यासाठी ५५ अतिरिक्त बसेस उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन होता. या अनुषंगाने गडचिरोली जिल्ह्यासाठी ५५ अतिरिक्त बसेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. गडचिरोली जिल्ह्यासाठी प्रती बस अंदाजे ४० लक्ष याप्रमाणे एकूण ५५ अतिरिक्त बसेससाठी २२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. राज्य परिवहन महामंडळाने बसेसच्या खरेदीसाठी आवश्यक ती कारवाई करून खरेदीसाठी लागणाऱ्या निधीची मागणी मानव विकास आयुक्तालयाकडे करावयाची आहे. शासनाकडून मानव विकास योजनेंतर्गत गडचिरोली जिल्ह्याला बसेस मिळाव्यात, यासाठी मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी विशेष प्रयत्न केले होते. या बसेसमुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींच्या स्वप्नांना निश्चितच बळकटी मिळणार आहे.

# सानेगुरुजीच्या कर्मभूमीत कवी ढोणे सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** प.पूज्य सानेगुरुजी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कर्मभूमीत अर्थात अमळनेर येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात एसटी महामंडळाच्या नांदेड विभागात चालक म्हणून कार्यरत असलेले कवी श्री महादेव ढोणे यांना सन्मानित करण्यात आले.अमळनेर येथे ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिनांक २ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी या कालावधीत मोठ्या थाटामाटात संपन्न झाले. विशेष बाब म्हणजे कवी महादेव ढोणे यांच्या कवितेची निवड सलग दुसऱ्यांदा होऊन कवीकट्ट्यावर अभिव्यक्त होण्याची संधी मिळाली.या संमेलनात हदगाव आगारातील कवी श्री.महादेव ढोणे हे दि. ३ फेब्रुवारी रोजी कवी गणेश कुडे कवीकट्टा या व्यासपीठावर उपस्थित होते. त्यांनी आयोजकांनी निवड केलेली "ती म्हणाली...चुकलंच माझं" हे शीर्षक असलेली एक वेगळा आशय आणि विषय असलेली प्रेम कविता सादर करून उपस्थित रसिकांची मने जिंकली."कवी कट्टा" या मंचावर मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र व सुंदर असे सन्मानचिन्ह देऊन त्यांना गौरवण्यात आले.त्यांचा पूर्वी कार्यरत असलेले राजुरा आगार तसेच सध्याच्या हदगाव आगारातील सहकारी अधिकारी,कर्मचारी बांधवांच्या वतीने व एसटी साहित्य रसिक समूहाच्या वतीने व तसेच गावाकडील मित्रमंडळी, नातेवाईक यांनी सुद्धा श्री महादेव ढोणे यांचे विशेष अभिनंदन केले आहे.



# डोंगर पोखरणाऱ्या लोकांवर गुन्हे दाखल करा

## सामाजिक कार्यकर्ते वीरेंद्र वाघ

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** छत्रपती संभाजीनगर -धुळे महामार्गावर असलेले काळजीपुरा शिवारातील गट नंबर 21 मधील मुळ जमिन मालक नामे रवी अग्रवाल मुखत्यार पत्रधारक सौ अनिता चव्हाण, आनंद अग्रवाल, सुशांत तिवसकर यांच्यावर गुन्हे दाखल करावेत अशी तक्रार सामाजिक कार्यकर्ते विरेंद्र वाघ यांनी तहसीलदार यांच्या कडे केली आहे.सविस्तर वृत्त असे की खुलताबाद तालुक्यातील कागजीपुरा शिवारात गेल्या दोन महिन्यापासून जमीन सपाटीकरण करण्यात येत आहे,याप्रकरणी खुलताबाद येथील सामाजिक कार्यकर्ते वीरेंद्र वाघ यांनी तहसीलदार खुलताबाद यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आली आहे. तक्रारीत असे म्हटले आहे की रवी



अग्रवाल मूळ जमीन मालक यांचे मुखत्यार पत्रधारक सौ अनिता चव्हाण यांनी तहसील कार्यालय मार्फत जमीन सपाटीकरण परवानगी मागविण्यात आली होती परवानगी 15 दिवसाची असून हे काम जवळपास दोन महिने चालू राहिले म्हणजे पंधरा दिवसाची मुदत परवानगीची असताना वरील लोकांनी पंधरा दिवसापेक्षा जास्त काम केले तसेच जमीन सपाटीकरण बरोबरच या गट नंबर मधील डोंगर पोखरण्यात आला आहे तसेच शेजारच्या गटातील मावसाळा येथील शासकीय विश्रामगृहाच्या संपूर्ण पायऱ्या तोडल्या व शासकीय मालमत्तेचे नुकसान करणारे व या गटात असलेल्या दुर्मिळ वनस्पती व अनेक झाडे नष्ट केले या सर्वांना जबाबदार असणारे , तहसीलदार यांच्या परवानगी आदेशाचे उल्लंघन करणारे या सर्व प्रकाराला जबाबदार असणारे नामे रवी अग्रवाल या गटातील मूळ जमीन मालक, सौ अनिता चव्हाण मुखत्यार पत्रधारक, आनंद अग्रवाल सुशांत तिवसकर सदरील काम बघणारे यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे व दंड आकारण्यात यावा अशी तक्रार करण्यात आली आहे, जर वरील प्रमाणे कारवाई न झाल्यास आंदोलन करण्यात येईल असा इशारा वीरेंद्र वाघ यांनी दिला आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# शेतकऱ्यांतील नकारात्मकतेचे विष काढून टाकण्यास मदत करा

## जागतिक आध्यात्मिक आणि मानवतावादी नेते गुरुदेव श्री श्री रविशंकर यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** एक जरी शेतकरी दुःखी किंवा तणावग्रस्त दिसला, तर थांबा आणि त्याच्याशी बोला. त्याला काय त्रास होतोय ते विचारा. त्याच्या मनातून नकारात्मकतेचे विष काढून टाकण्यास मदत करा. महाराष्ट्र सरकारनेही भविष्यात शेतकरी आत्महत्या होणार नाहीत याबद्दल काळजी घ्यावी. यासाठी आमचे आर्ट ऑफ लिव्हिंगचे स्वयंसेवक तुमच्यासोबत काम करतील, अशी ग्वाही जागतिक अध्यात्मिक आणि मानवतावादी नेते गुरुदेव श्री श्री रविशंकर यांनी दिली.

दहा हजार शेतकरी, ५०० सरपंच आणि गावांचे प्रमुख यांचा ऐतिहासिक ग्रामोत्सव महाराष्ट्र या मेळाव्यात ते बोलत होते. आर्ट ऑफ लिव्हिंगच्या त्रिवेणी आश्रम, मरकळ (आळंदी) येथे हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी हिवरे बाजारचे सरपंच व पद्मश्री पुरस्कारप्राप्त पोपटराव पवार, अभिनेते आणि पर्यावरण कार्यकर्ते सयाजी शिंदे व अन्य मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

आर्ट ऑफ लिव्हिंग सामाजिक प्रकल्प आणि महाराष्ट्र सरकार-मनरेगा यांनी जलतारा प्रकल्पाला पुढे नेण्यासाठी सामंजस्य करार केला. यावेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे ओएसडी मंगेश चिवटे, महाराष्ट्र मनरेगा विभागाचे ओएसडी राहुल गेठे, तसेच रोहयो - मनरेगा विभागाच्या उप सचिव संजना घोपडे उपस्थित होत्या. नैसर्गिक शेती, जलयुक्त शिवार, ग्रामविकासातून राष्ट्रविकास अशा अनेक विषयांवर गुरुदेव श्री श्री रविशंकर यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, आपल्याला शेतकरी आत्महत्या ताबडतोब थांबवायला हव्यात. जर शेतकरी दुःखी असतील तर ग्राहक ही निरोगी राहू शकत नाही.

गुरुदेवांनी गावातील प्रमुखांना आणि पालकांना युवक आणि मुले व्यसन आणि दारूपासून दूर राहतील याची काळजी घेण्याचे आवाहन केले. "संत तुकाराम आणि संत नामदेव यांच्या काळात जशी भक्ती आणि आनंदाची लहर होती, तशी आता वाढवायला हवी." असेही ते म्हणाले.

आर्ट ऑफ लिव्हिंगने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी केलेल्या कामामुळे आपल्या जीवनात बदल घडला आणि समृद्धी आली याबद्दल हजारो शेतकऱ्यांनी गुरुदेवाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सुमारे १०,००० हून अधिक आदिवासी शेतकऱ्यांना नैसर्गिक आणि शाश्वत शेतीचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनवले आहे. विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या कार्यक्रमात ही या प्रकल्पाचा उल्लेख केला गेला होता.




**केवळ झाडेच सेलिब्रिटी :** सयाजी शिंदे यांनी सांगितले, "आज गुरुदेवांच्या उपस्थितीत मी अनुभवले की जेव्हा आपण सकारात्मक विचारसरणीने काम करतो तेव्हा काम कसे यशस्वीपणे होते." त्यांनी प्रत्येकाला किमान ५०० झाडे लावण्यासाठी प्रोत्साहित केले. "केवळ झाडे सेलिब्रिटी दर्जाला पात्र आहेत, असेही ते म्हणाले.

**नैसर्गिक शेती करा :** पोपटराव पवार म्हणाले, "केवळ रसायनमुक्त शेतीमुळेच आपल्या भावी पिढ्या निरोगी राहतील. त्रेतायुगात आपल्याला मिळालेले रामराज्य हवे असेल तर आपल्याला गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या संकल्पनेची अंमलबजावणी करावी लागेल आणि सर्वत्र नैसर्गिक शेती करावी लागेल.

राज्यात सर्वांगीण ग्रामीण विकास घडवून आणण्याच्या आपल्या प्रयत्नाचा भाग म्हणून, आर्ट ऑफ लिव्हिंगने महाराष्ट्र सरकारसोबत नुकत्याच स्वाक्षरी केलेल्या सामंजस्य करारांतर्गत, महाराष्ट्रात १३ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रात नैसर्गिक शेतीचा अवलंब करीत असून त्याकरिता हजारो शेतकऱ्यांना प्रशिक्षण देत आहे. आणि ते एवढ्यावरच थांबणार नाहीत, तर ते त्यांच्या उत्पादनासाठी थेट बाजारपेठ उपलब्ध करून देत आहेत, ज्यामुळे मध्यस्थ दलालांना वगळले जाईल आणि परिणामी शेतकऱ्यांच्या नफ्यामध्ये वाढ होईल. आजच्या कार्यक्रमात किसान बास्केट लॉन्च करण्यात आली आहे, ज्यामध्ये ग्राहकांना बास्केटची निर्मिती करण्यासाठी सदस्यत्व घेऊन थेट शेतकऱ्यांशी संपर्क साधता येईल. नैसर्गिक शेतीचे अनेकविध फायदे आहेत. महाराष्ट्रातले शेतकरी किशोर थोरात सांगतात, "गुरुदेवांच्या प्रेरणेने, मी गेली सात वर्षे नैसर्गिक शेती करत आहे. मिश्र पिके घेऊन, नैसर्गिकरित्या पिकवलेल्या फळे आणि भाज्यांचे दर आता मी ठरवतो. एक एकर जमिनीत मी २८ प्रकारची फळे आणि ४० प्रकारच्या भाज्या पिकवतो. मला वर्षाला सुमारे ७ लाख रुपये नफा मिळतो." नैसर्गिक शेतीचे प्रशिक्षण घेतलेले आणखी एक शेतकरी, फलटण जवळील धुमाळवाडी गावातील दत्तात्रय डुमर, पिकवलेली फळे संपूर्ण भारत, दुबई आणि यूकेमध्ये विकत आहेत. तसेच ते सर्व सेंद्रिय उत्पादन असल्याने रासायनिक खतांवर पैसा वाया जात नाही.

आर्ट ऑफ लिव्हिंगच्या जलतारा प्रकल्पांतर्गत ४५,५०० जलतारा रिचार्ज स्ट्रक्चर्स ११५ गावांमध्ये केवळ २ वर्षात बांधून लाखो लोकांना फायदा झाला आहे. जलतारा रिचार्ज स्ट्रक्चर्स रेती, बारीक गिट्टी आणि खडकांनी भरलेल्या ४x ४x६ आकाराच्या रिचार्ज स्ट्रक्चर्स आहेत, ज्यामुळे पाणी वाहते, झिरपते आणि भूजलाचे पुनर्भरण होते, ज्यामुळे पूर रोखला जातो, धूप कमी होते आणि जमिनीचे पोषण राखत शेतकऱ्यांच्या पिकांचे संरक्षण होते. पाण्याच्या पातळीत सरासरी १४ फुटांनी सुधारणा झाली आहे; शेतकऱ्यांचे उत्पन्न सरासरी १२०% पेक्षा जास्त वाढले आहे आणि पीक उत्पादनात ४२% पेक्षा जास्त सुधारणा झाली आहे.

# रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे वार्षिक स्नेहसंमेलन, क्रीडा महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था द्वारा संचालित रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे दोन दिवसीय वार्षिक क्रीडा महोत्सव आणि वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे संचालक सचिव डॉ.मारोती वाघ, प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या संचालिका प्राचार्य सौ.लता वाघ, अंतोदय महाविद्यालय देवाग्रामचे प्राचार्य देवेंद्र भोंगाडे, डॉ. नारायण मेहरे संचालक मुक्त विद्यापीठ नागपूर विभाग भारतीय शिक्षण मंडळ विदर्भ प्रांताचे संघटन मंत्री डॉ. नितेश सिंह, प्रेरणादायी वक्ते प्रा.शाम हेहाऊ, रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स प्रभारी प्राचार्य डॉ. अर्चना कहाळे पत्की, सरस्वती भवन कॉन्व्हेंट अँड ज्युनिअर कॉलेज पाटणसावंगीच्या मुख्याध्यापिका सौ. ममता मिश्रा, सरस्वती भवन च्या मुख्याध्यापिका सौ. चंचल चौबे, सरस्वती भवन हायस्कूलच्या मुख्याध्यापिका निशा फिलिप्स ,सरस्वती महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य ओम चौधरी, सरस्वती गर्ल्स कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य कांचन तिवारी ,डॉ. गजानन पोलंवार असिस्टंट प्रोफेसर हिंदी विभाग प्रमुख तायवाडे महाविद्यालय कोराडी, धनंजय साखरकर टाइम्स जिल्हा प्रतिनिधी चंद्रपूर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शाहू महाराज तसेच सरस्वती मातेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.संगीत विभाग प्रमुख प्रा. सचिन देशमुख आणि प्रा. हर्षल रोठे आणि चमू द्वारे स्वागत गीत, विद्यापीठ गीत सादर करण्यात आले.

यावर्षी सरस्वती इन्स्टिट्यूट ची संकल्पना ही वार्षिक स्नेहसंमेलनाकरिता गर्जा महाराष्ट्र माझा अशी होती. उपस्थित मान्यवर स्नेहसंमेलनातील संस्कृतीचे जतन बघून अगदी भारावून गेले.डॉ. देवेंद्र भोंगाडे सर यांनी डॉ. मारोती वाघ व सौ.लता वाघ मॅडम यांनी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा वारसा समोर नेत असल्याचे व हे संस्कार वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देण्याकरता मोठ्या प्रमाणात व्यासपीठ उपलब्ध करून देत असल्याचे बघून आनंद होत असल्याचे मत व्यक्त केले.डॉ. नारायण मेहरे सर यांनी सरस्वती इन्स्टिट्यूट म्हणजे संस्काराचे माहेरघर असल्याचे तसेच ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न हे इन्स्टिट्यूट हे महाविद्यालय करत असल्याचे सांगितले. संस्थेच्या संचालिका सौ.लता वाघ यांनी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगती बरोबर व्यक्तिमत्व विकासाची प्रगती सांस्कृतिक कार्यक्रमातून करावी असे आवाहन केले. अध्यक्ष स्थानावरून बोलताना संस्थेचे संचालक सचिव डॉ. मारोती वाघ यांनी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्र क्रीडा क्षेत्र राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेतली तसेच सांस्कृतिक क्षेत्रात ही झेप घ्यावी अशी अशा व्यक्त केली कार्यक्रमादरम्यान रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सच्या प्रभारी प्राचार्य डॉ.अर्चना कहाळे पत्की यांनी अहवालाचे वाचन केले.

# हिंदी विद्यापीठातील आंदोलकांची प्रकृती चिंताजनक

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** हिंदी विद्यापिठातील आंदोलनास बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी एकाची प्रकृती चिंताजनक झाल्याने त्याला अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे. विविध कारणांनी नेहमीच वादग्रस्त ठरलेल्या येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापिठात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. २६ जानेवारीच्या कार्यक्रमात काही विद्यार्थ्यांवर अशांती निर्माण केल्याचा ठपका ठेवून निलंबनाची कारवाई करण्यात आली. मात्र, ही कारवाई बेकायदेशीर असून निलंबनाचे कारण पण दिले नसल्याचा आरोप करीत विवेक मिश्र या विद्यार्थ्याने सत्याग्रह आंदोलन सुरू केले. न्याय न मिळाल्याचे स्पष्ट करीत या विद्यार्थ्याचे आमरण आंदोलन सुरू केले. त्याची प्रकृती बिघडल्याने त्याला जिल्हा सामान्य रूग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, प्रकृती चिंताजनक झाल्याने त्याला अतिदक्षता विभागात हलविण्यात आले आहे. या विद्यार्थ्यासोबतच आंदोलन करणाऱ्या जतीन चौधरी यालाही बडतर्फ करण्यात आले आहे. ही कारवाई झाल्यानंतर संतप्त विद्यार्थ्यांनी गुरूवारी रात्रीच प्रशासनास जाब विचारण्याचे ठरविले. मात्र, त्यांना रस्त्यातच सुरक्षारक्षकांनी अडवून मारहाण केली. त्यात दिनेश, आदित्य, स्वराज हे विद्यार्थी जखमी झाले. या कारवाई विरोधात रामनगर पोलीसांकडे तक्रार दाखल करण्यात आल्याचे विद्यार्थ्यांनी स्पष्ट केले. दिपक यादव याने प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मारहाण केल्याची तक्रार पोलीसांकडे केली आहे. तर उपचार घेणाऱ्या विवेक मिश्र या विद्यार्थ्याने एका पत्रातून आपल्या चिंताजनक स्थितीस कुलगुरू व कुलसचिव जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. या सर्व प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

# विमा प्रस्ताव नाकारल्याने कृषी अधिकाऱ्यांना घेराव; शेतकरी करणार उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** तालुक्यांतील शेतीपिकांनी पिक विमा भरूनही संबंधित विमा कंपन्या शेतकऱ्यांना पिक विमा देण्या साठी धजावत नाही. कृषी व महसूल विभागाने नुकसानीचे अहवाल दाखल करूनही शेतकऱ्यांच्या विमा प्रस्ताव नाकारल्या गेल्याने तालुका कृषी अधिकारी यांना घेराव टाकून शेतकऱ्यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे.

गत २६ नोव्हेंबर रोजी परिसरात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेती पिकांचे आतोनात नुकसान झाले असुन शासन दरबारी तालुक्यातील ३६ हजार हेक्टर पेरणी क्षेत्रावरील पिकांचे ९० टक्के नुकसान झालेL असल्याबाबतचा अहवाल दाखल आहे. हार्वेस्टिंग क्रॉप आणि कटिंग क्रॉप यातील फरक न समजल्यामुळे काही शेतकऱ्यांचे विमा प्रस्ताव कंपनीने नाकारले आहेत. तसेच 72 तासांत तक्रार करणे अनिवार्य असल्यामुळे व त्यादरम्यान सदरील ॲप सर्वर बंद दाखवीत असल्यामुळे काही शेतकऱ्यांनी विहित कालावधीत तक्रारी केल्या नाहीत असे दाखउन त्यांचे प्रस्ताव नाकारले आहेत. या सर्व बाबींवर यापूर्वी शेतकऱ्यांनी वारंवार तहसिलदार, कृषी अधिकारी, विमा प्रतिनिधी यांना निवेदने दिलेली आहेत . तरी यावर विमा कंपनीकडून काही कार्यवाही केली गेलेली नाही. या सर्व प्रकाराला कंटाळून गोंधनखेड, चिंचोली, बामखेड या गावांतील शेतकर्यांनी कृषी अधिकाऱ्यांना घेराव घातला व पुढील १० दिवसांत विमा प्रस्ताव मंजुर न केल्यास गोंधनखेड येथील शेतकरी गजानन जायभाये यांच्यासह या अन्यायग्रस्त गावांतील शेतकर्यांनी २० तारखेपासून आमरण उपोषणाचा इशारा दिला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार चे विधानसभा अध्यक्ष प्रमोद घोंगेपाटील, उपोषणकर्ते शेतकरी बालाजी सोसे, गजानन जायभाये, संभाजी मुदगुल, रामकिसन जायभाये, देवानंद गिते, नामदेव घोंगे, शंकर बुरकुल, विष्णु घोंगे, बबनराव बुरकुल, संतोष नागरे, राजेंद्र मांटे, संतोष घोंगे, कारभारी जायभाये, ज्ञानेश्वर नागरे, गजानन मांटे, शरद घोंगे, लहू नागरे, खंडू जायभाये , योगेश घोंगे, गजानन नागरे आदी शेतकरी मोठया संख्येने उपस्थीत होते.

विमा प्रस्ताव ऑनलाईन नाकारल्या संदर्भात तालुक्यातील गोंधणखेड, चिंचोली, बामखेड येथील शेतकऱ्यांनी निवेदन सादर केले आहे. गारपीटग्रस्त शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून त्यांना पिकविम्यायाचा लाभ मिळणे संदर्भात संबंधित एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीशी पत्रव्यवहार करून शेतकऱ्यांना नियमानुसार पिक विमा साठी पात्र करण्या करिता सकारात्मक पाऊल उचलू

**–भगवान कछवे, तालुका कृषी अधिकारी देऊळगाव राजा**

**विमा कंपन्यांची बनवाबनवी :** नैसर्गिक आपत्ती उद्भवल्या नंतर झालेल्या पीक नुकसानी बाबत शेतकऱ्यांना पिकविमा चा लाभ देताना विमा कंपन्या क्षुल्लक कारण देऊन तसेच तांत्रिक चुकांवर बोट ठेवून पिक विमा नाकारतात .परिणामी शेतकऱ्यांना पात्र असतानाही पिक विमा चा लाभ मिळत नाही . विमा कंपन्यांवर शासनाचे नियंत्रण राहिले नसल्याने शेतकऱ्यांवर उडवलेली नैसर्गिक आपत्ती ही बळीराजाला संकटाच्या दरीत बुडवणारी ठरत आहे . विमा कंपन्यांची ही बनवाबनवी खपवून घेतली जाणार नाही .

**– प्रमोद घोंगे, मतदारसंघ क्षेत्रअध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार**





# पुरोगामी पत्रकार संघटनेची कार्यकारिणीजाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**मोताळा :** दि.६ रोजी मोताळा येथील बोधेकर कॉम्प्लेक्स (मोताळा फाटा) येथे मंगळवार रोजी झालेल्या बैठकीत पुरोगामी पत्रकार संघटनेची कार्यकारणी जाहीर करण्यात आली.या प्रसंगी राज्य उपाध्यक्ष विष्णू कंकाळ, विदर्भ अध्यक्ष किरण मोरे, जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण कान्हेरकर या मान्यवरांच्या हस्ते नवीन कार्यकारणी जाहीर करून नियुक्ती पत्र देण्यात आले. मोताळा तालुका अध्यक्षपदी विजय दोडे, उपाध्यक्षपदी किशोर वाकोडे, सचिवपदी इमरान शहा हुसेन शहा, महासचिवपदी विशाल मोरे, कार्याध्यक्षपदी शेख अफसर शेख अकबर,संघटकपदी रोशन गायकवाड, सल्लागारपदी शेषराव दाभाडे यांची नेमणूक करून सन्मानित करण्यात आले.यावेळी सर्व पदाधिकाऱ्यांना संघटनेचे उद्दिष्ट, संघटनेचे धोरण, संघटनेची बांधनी किती महत्त्वाची आहे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण कान्हेरकर यांनी प्रास्ताविक करताना सांगितले.त्यावेळी खामगाव शहर अध्यक्ष पद्माकर धुरंदर, नांदुरा शहर उपाध्यक्ष शिवशंकर कुटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल मोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन रोशन गायकवाड यांनी केले...?